नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर - 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
जोडी घेतल्यास फक्त 4 रुपयात
महासागर किंमत Rs. 3 / Nagpur Post Rs. 3 = 6

* वर्ष ५१ * अंक २४५ * * अकोला * शुक्रवार, दिनांक २८ फेब्रुवारी २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

## प्रेयसी व कुटुंबातील ५ जणांची हत्या

■ **वृत्तसंस्था, तिरुवनंतपुरम, दि. २७ :**
केरळमधील तिरुअनंतपुरममधील वेंजरमुडू येथे एका २३ वर्षीय तरुणाने पाच जणांची हत्या केली. आरोपीचे नाव अफान आहे. त्याने प्रेयसी, भाऊ, आजी, काका आणि काकू यांची चाकू आणि हातोड्याने निर्घृण हत्या केली. यानंतर, आरोपीने आईवर हल्ला केला आणि तिलाही मारण्याचा प्रयत्न केला.

तरुणाने पूर्ण नियोजन करून तीन वेगवेगळ्या ठिकाणी ही घटना घडवून आणली. त्यानंतर तो वेंजारामूडू पोलिस ठाण्यात गेला आणि आत्मसमर्पण केले आणि आपला गुन्हा कबूल केला. पोलिस स्टेशनमध्ये आरोपीने सांगितले की त्याने त्याची आई आणि मैत्रिणीसह ६ जणांची हत्या केली आहे. पोलिसांनी आतापर्यंत ५ जणांच्या मृत्यूची पुष्टी केली आहे .

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## गंगा यमुना आक्रंदत आहेत

आपल्याला सोनम वांगचुक यांचे नाव माहित आहे का. बहुतेकांना एवढ्यात किंवा हल्लीच्या काळात त्यांचे नाव बऱ्याच वृत्तपत्रांमधून छापून आल्याने माहिती असेल. हा माणूस किती मोठा आहे, याची कल्पना ज्यांनी आमिर खानचा 'थ्री इडियट' पाहिलेला आहे. त्यांना नक्कीच आलेली आहे. त्यांना हे नाव नक्कीच माहीत असावे. कारण तो सिनेमा या वांगचुक यांच्या कार्यावर आणि त्यांच्या असामान्य बुद्धी कौशल्यावर आधारित होता. हे सोनम वांगचुक हिमालयाच्या बदलत असलेल्या भयानक परिस्थिती बाबत अत्यंत जागृत असतात. त्यांनी काही दिवसांपूर्वी बरेच दिवस उपोषणही केले होते. सोनम वांगचुक परवा जे काही बोलले. त्याचा अर्थ असा आहे की, हिमालयात जे ग्लेशियर्स आहेत. ते वितळून गेले तर पुढील 144 वर्षात त्या वेळचा महाकुंभ नदीपात्रातल्या रेतीतच करावा लागेल. म्हणजेच ज्याप्रमाणे गंगा आणि यमुना यांच्यासोबत सरस्वतीही प्रकटीत होती. ती सरस्वती पाच हजार वर्षांपूर्वी अशाच कारणांमुळे, त्यासोबतच पर्यावरणीय बदल आणि भूगर्भीय हालचालीमुळे विलुप्त झाली होती. त्यावेळी सरस्वतीचा प्रवाह गंगा आणि यमुना यांच्या संगम स्थळापासून विलग झाला होता. त्या वेळेच्या जनतेने असाच पर्यावरणीय संहार केला असेल, असे आपण समजूया. सरस्वती नदी लुप्त झाली. ही आपली श्रद्धा आहे. पण त्या सरस्वती नदीप्रमाणेच देशातील कितीतरी मोठमोठ्या नद्या सध्या कोरड्या पडलेल्या आहेत. त्या नद्या कुठल्या याचा शोध घेतला. तर आपले डोळेच पांढरे होतील. भारतातील शहरे किंवा गावे नदी शेजारीच किंवा त्याच्या आसपासच उभी झालेली आहेत. माणसाला जगण्याकरता पाणी हवे असते. जे पाणी फक्त नद्याच देतात. परंतु मानवाच्या विनाशकारी विकासाच्या कल्पनांमुळे आज अनेक नद्या बारमाही न वाहता आणि न राहता केवळ पावसाळी नद्या झालेल्या आहेत. हे आपण सर्वजण जाणतोच. मात्र आपल्याला जगण्याकरता जे पाणी हवे असते. ते पाणी नद्याच देतात. या गोष्टीचीही जाणीव ठेवणे आता गरजेचे झालेले आहे. ज्या गंगोत्री मधून गंगेचा उगम होतो. तीच गंगोत्री दिवसेंदिवस मागेमागे सरकत आहे. 2012 आणि 2016 या सालामध्ये येथील (बर्फाच्या नदीचा म्हणजेच बर्फाचा, त्यालाच ग्लेशियर म्हणतात.) ग्लेशियरचा मोठा तुकडा तुटला होता. त्याचे कारण ज्या ज्या ठिकाणी हे ग्लेशियर आहे. त्या ठिकाणी दिवसेंदिवस बर्फ पडण्याचे प्रमाण कमी होत आहे. उत्तर आणि पूर्व दिशेतून ज्या ज्या नद्या वाहतात. त्यापैकी अनेक नद्यांचे उगमस्थान हिमालयात आहे. आजच्या घडीला जवळजवळ 9000 ग्लेशियर हिमालयामध्ये शिल्लक उरलेले आहेत. मात्र गेल्या 30 वर्षात दिवसेंदिवस परिस्थिती अतिशय गंभीर होत आहे. याचे कारण हिमालयात माणसांचा हस्तक्षेप हेच आहे. जिकडे तिकडे पर्यटनासाठी हिमालयात खोदकाम सुरू आहे. त्यातून भूगर्भात अनेक भुयारे तयार झालेली आहेत. पूर्वी हिमालयात धार्मिक यात्रेसाठी लोक जात होते. आता धार्मिक यात्रा वगैरे कार्यक्रम बंद झालेला दिसतो. लोक हिमालयात मजेदार पर्यटन करण्यासाठी जातात. ही मंडळी तिथे गेल्यावर किती हजार किलो कचरा तिथे सोडून येतात. याची मोजदाद करायला कोणालाही वेळ नाही. सरकार मात्र कागदावर अनेक व्यवस्था करत असते. परंतु प्रत्यक्षात सगळीच बोंबाबोंब आहे. हिमालयात तेथील निवास करणारी जी जनता आहे, त्यांच्यासाठी उत्तम रस्ते तयार करणे चांगलेच आहे. पण ते रस्ते तयार करताना जी विनाशलीला होते. त्यामुळे संपूर्ण हिमालय संकटात सापडलेला आहे. एक तर हिमालय सर्वात तरुण पर्वत आहे. त्यामुळे अजून तो कच्चा आहे. त्यामुळे जी परिस्थिती उत्पन्न झालेली आहे. त्याचे खरे दर्शन वांगचुक यांनी आपल्याला दाखवून दिलेले आहे. आता गंगा आणि यमुना या नद्यांमधील प्रवाह सुद्धा तेवढा जबरदस्त राहिलेला नाही. तो प्रचंड प्रमाणात कमी झालेला आहे. मग वांगचूक म्हणतात त्याप्रमाणे पुढील 144 वर्षात गंगा नदी इतिहास जमा झाली. तर तेथे फक्त वाळूच राहील. त्यानंतर ही वाळू सुद्धा आमचे बांधकाम व्यवसायिक तिथे राहू देणार नाहीत. देशातील नद्या वाचल्या तर जनता वाचेल. नद्यांचे पाणी म्हणजे जीवन आहे. बिचारे सोनम वांगचुक संपूर्ण भारत वर्षाच्या काळजीमुळे जनतेला आणि सरकारला इशारे देत आहेत. पण सरकार किंवा जनता या दोघांनाही त्या इशा?याचे गांभीर्य अजून तरी कळलेले दिसत नाही. सरकारला रस आहे तो सत्ताकारणात आणि जनतेला रस आहे तो राजकारणात. असे सरकार आणि अशी जनता पुढील काही वर्षापर्यंत फक्त महाकुंभ, परमकुंभ, अति परमकुंभ आणि परमोच्च कुंभ यांच्या पावन पर्वातील डुबकीसाठी तरसणार आहेत. हे तुम्ही नीट नोंद करून ठेवा. 'हम रहें ना रहें भारत में नदियां बहनीही चाहिए' लक्षात ठेवा, फक्त गंगा-यमुनाच नाही, तर देशातील सर्वच नद्या आक्रंदत आहेत.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

स्वारगेट बलात्कार प्रकरण..

# आरोपीचा कसून शोध



■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २७ :**
पुण्यातील स्वारगेट बसस्थानकावर शिवशाही बसमध्ये झालेल्या अत्याचार प्रकरणामुळे अवघ्या महाराष्ट्रात खळबळ माजली आहे. पोलिसांनी या प्रकरणातील आरोपीचा शोध घेण्यासाठी युद्धपातळीवर हालचाली सुरू केल्या आहेत.

आरोपीची ओळख पटल्यामुळे त्याच्या कोणत्याही क्षणी मुसक्या आवळल्या जातील असा अंदाज आहे. तूर्त पोलिसांनी त्याला फरार घोषित केले असून, त्याची माहिती देणाऱ्याला १ लाख रुपयांचे बक्षीस देण्याचीही घोषणा केली आहे.

आरोपी दत्तात्रय गाडे हा त्याच्या गुनाट गावातील एका ऊसाच्या शेतात दडी धरून बसल्याचा संशय आहे. त्यामुळे त्याच्या शोधासाठी पोलिसांचे एक मोठे पथक गुनाट गावात पोहोचले आहे. हे पथक ड्रोन व श्वान पथकाच्या माध्यमातून आरोपीचा माग काढण्याचा प्रयत्न करत आहे.

आरोपीला पुणे पोलिसांनी फरार घोषित केले असून, आरोपीला अटक करण्यासाठी नागरिकांची मदत मागितली आहे. दत्तात्रय गाडे याच्याबद्दल कोणतीही माहिती मिळाल्यास तातडीने पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन पुणे पोलिसांनी केले आहे.

आरोपी पोलिसांच्या हातावर तुरी देण्यासाठी वेगवेगळ्या युक्त्या वापरत आहे. तरुणीवर बलात्कार केल्यानंतर आरोपी दत्तात्रय गाडे बसस्थानकातून पळून गेला. त्यानंतर तो पुणे किंवा शिरुर येथील आपल्या घरी गेला नाही.

पोलिसांनी यासंबंधी त्याच्या भावाची कसून चौकशी केली. त्यात त्याने तो घरी आला नसल्याचे सांगितले. आरोपीकडे मोबाईल फोनही नाही. त्यामुळे त्याचे लोकेशन ट्रॅक करण्यात पोलिसांना अडचणी येत असल्या तरी पोलीसही माग काढत आहेत. ▶▶ पान ८ वर

तरुणीने प्रतिकार केला नसल्याने बलात्कार...

## गृह राज्यमंत्र्यांचे तर्कट

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २७ :**
स्वारगेट बसस्थानकाच्या शिवशाही बसमध्ये ही घटना घडली तेव्हा तरुणीने विरोध न केल्याने कुणालाही शंका आली नाही, त्यामुळे आरोपीला गुन्हा करता आला, असे अजब तर्कट गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी दिले आहे.

दरम्यान, बलात्काराच्या या अतिभयंकर घटनेनंतर युवतीलाच दोष देण्याच्या गृहमंत्र्यांच्या वक्तव्यामुळे विरोधक संतप्त झाले असून, कदम यांच्यावर तूफान टीका केली जात आहे.

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी महायुती सरकार आरोपीला वाचवण्यासाठी पीडित मुलीवरच आरोप करत असल्याचा आरोप केला आहे. ते म्हणाले, स्वारगेट बलात्कार प्रकरणातील आरोपीसोबत महायुतीचे नाते काय? आरोपीला वाचवण्यासाठी पीडित मुलीवरच महायुतीतील मंत्र्याकडून आरोप का? स्वारगेट बलात्कार प्रकरणात अजून आरोपी पकडला नाही, तरी गृहराज्यमंत्री योगेश कदम हे आरोपीला क्लिनचीट देत आहेत?

स्वारगेट मध्ये बलात्कार झाला आणि या मंत्र्यांच्या मते त्या मुलीने विरोध केला नाही, म्हणजे या गुन्ह्याची जबाबदारी त्या पीडित मुलीवर ढकलत आहे. विधान करताना मंत्र्यांनी थोडी लाज शरम बाळगली पाहिजे! आरोपीला शोधण्याऐवजी पीडित मुलीला दोष देऊन सिद्ध काय करायचं आहे? आरोपीला क्लिनचीट देण्यासाठी मंत्र्यांची इतकी घाई का आहे? राज्यातील महिलाना लाडक्या बहिण म्हणून ▶▶ पान ८ वर

स्वारगेट एसटी आगारात तरुणीवर

## दोनदा बलात्कार

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २७ :**
पुण्यातील स्वारगेट बसस्थानकात २६ वर्षीय तरुणीवर बलात्कार झाल्याची घटना बुधवारी समोर आली होती. याप्रकरणी पोलिसांनी चौकशी सुरू केली आहे.

यादरम्यान पीडित तरुणीचा मेडिकल अहवाल समोर आला असून त्यामध्ये धक्कादायक माहिती समोर आली आहे. पीडित तरुणीवर एकवेळा नव्हे तर दोन वेळा लैंगिक अत्याचार झाल्याचे अहवालातून समोर आले आहे. या घटनेमुळे संतापाची लाट उसळली आहे.

पुण्यातील नेहमीच वर्दळ असणाऱ्या स्वारगेट बसस्थानकात बुधवारी पहाटे एक २६ वर्षीय तरुणीवर अत्याचार झाल्याची घटना घडली. बुधवारी दुपारच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. पुण्यात काम करणारी तरुणी फलटणला आपल्या गावी जाण्यासाठी स्वारगेट बसस्थानकात आली होती. यावेळी आरोपी दत्तात्रय गाडे या नराधमाने एसटी आगारात उभ्या असलेल्या शिवशाही बसमध्ये तरुणीवर अत्याचार केले होते.

दरम्यान, मेडिकल अहवालात या तरूणीवर एकदाच नव्हे तर दोन वेळा अत्याचार केल्याचे पुढे आले असून, त्यामुळे आरोपीविरोधात कमालीचा संताप वाढत आहे.

## आरोपीची खैर नाही : शिंदे



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ :**
पुण्यातील स्वारगेट बसस्थानकावर घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी आहे. लाडक्या बहिणीवर अत्याचार करण्याची गय केली जाणार नाही. आरोपी हा कुठल्याही पक्षाचा असला तरी त्याच्यावर कारवाई केली जाईल. नराधमाला फाशीची शिक्षा झाली पाहिजे, अशी सरकारची भूमिका आहे. त्यासाठी पूर्णपणे प्रयत्न करण्याचे सरकारचे धोरण असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

शिंदे म्हणाले, या घटनेचा निषेध करावा तेवढा कमीच आहे. आमच्या लाडक्यासोबत निंदनीय प्रकार घडलेला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मी स्वतः या ▶▶ पान ८ वर

## अक्षय शिंदेचा एन्काऊंटर बनावट असल्याचा मुद्दा कसा वगळला?

मुंबई हायकोर्टाचा सरकारला सवाल

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २७ :**
बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याचा एन्काऊंटर बनावट असल्याचा दावा करत संबंधित पोलिस अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले होते. यावर मुंबई उच्च न्यायालयात आज सुनावणी झाली. यावेळी मुंबई उच्च न्यायालयाने ठाणे सत्र न्यायालयावर नाराजी व्यक्त केली आहे.

अक्षय शिंदेचं एन्काऊंटर बनावट असल्याचा ठपका ठेवत संबंधित पोलिस अधिकाऱ्यांच्या भुमिकेवर सवाल उठवणारे अहवालातील दोन परिच्छेद कसे वगळले जाऊ शकतात? असा सवाल मुंबई उच्च न्यायालयाने ठाणे सत्र न्यायालयाला केला आहे. तसेच हे प्रकरण उच्च न्यायालयात सुरू आहे याची ठाणे सत्र न्यायाधीशांना कल्पना दिली होती का? असाही प्रश्न उच्च न्यायालयाने राज्य सरकारला विचारला आहे. तसेच ५ मार्च रोजीच्या सुनावणीमध्ये राज्य सरकारने आपली भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिले आहेत.

## दोन नक्षल्यांचे आत्मसमर्पण

■ **महासागर प्रतिनिधी गडचिरोली, दि. २७ :**
शासनाने जाहिर केलेल्या आत्मसमर्पण योजनेमुळे तसेच हिंसाचाराच्या जीवनाला कंटाळून वरिष्ठ माओवाद्यांसह अनेक माओवाद्यांनी पोलिसांपुढे आत्मसमर्पण केले आहे.

गुरूवार २७ फेब्रुवारी रोजी १ डीव्हीसीएम दर्जाच्या वरिष्ठ महिलेसह दोन माओवाद्यांनी पोलिसांपुढे आत्मसमर्पण केले. कांता उर्फ कांतक्का उर्फ मांडी गालू पल्लो (५६),डीव्हीसीएम सप्लाय टीम) रा. गुडंजूर (रिट) ता. भामरागड, सुरेश उर्फ वारलू ईरपा मज्जी (३०),भामरागड दलम सदस्य, रा. मिळदापल्ली, ता. भामरागड असे आत्मसमर्पण केलेल्या माओवाद्यांची नावे आहेत.

कांता उर्फ मांडी गालू पल्ला हिच्यावर ११ गुन्हे दाखल असून त्यामध्ये ७ चकमक, १ जाळपोळ व ३ इतर गुन्ह्यांचा समावेश आहे. शासनाने हिच्यावर १६ लाखांचे बक्षीस जाहीर केले होते.

सुरेश उर्फ वारलू ईरपा मज्जी याच्यावर चकमकीचा १गुन्हा दाखल असून इतर गुन्ह्यांत त्याचा सहभागाची पडताळणी सुरू आहे. शासनाने त्याच्यावर २ लाखांचे बक्षीस जाहिर केले होते.

सदर कारवाई नक्षलविरोधी अभियान नागपूरचे विशेष पोलिस महानिरीक्षक संदीप पाटील. गडचिरोली परिक्षेत्राचे पोलिस उप-महानिरीक्षक अंकित गोयल, सीआरपीएफचे उप-महानिरीक्षक अजय कुमार शर्मा, पोलिस अधीक्षक निलोत्पल, १९२ बटलियनचे कमांडंट परविंदर सिंग यांच्या मार्गदर्शनात पार पडली.

## वक्फ विधेयकात १४ बदलांना मान्यता

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २७ :**
केंद्रीय मंत्रिमंडळाने वक्फ सुधारणा विधेयकाला मंजुरी दिली आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, गेल्या आठवड्यात झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत या विधेयकाला मंजुरी मिळाली होती. सरकार ते संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या भागात सादर करू शकते. अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा भाग १० मार्च ते ४ एप्रिलदरम्यान चालेल.

संयुक्त संसदीय समितीच्या (जेपीसी) अहवालाच्या आधारे वक्फ विधेयकाचा नवीन मसुदा तयार करण्यात आला आहे. यापूर्वी, अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्यात १३ फेब्रुवारी रोजी संसदेत वक्फ विधेयकावरील जेपीसी अहवाल सादर करण्यात आला होता. विरोधकांनी हा अहवाल बनावट असल्याचे म्हटले होते. यानंतर संसदेत गदारोळ उडाला.

२७ जानेवारी रोजी, वक्फ (दुरुस्ती) ▶▶ पान ८ वर




## बनावट मतदारांच्या मदतीने भाजपने दिल्ली, महाराष्ट्र जिंकले

### ममता बॅनर्जीचा आरोप



■ **वृत्तसंस्था, कोलकाता, दि. २७ :**
पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी गुरुवारी कोलकाता येथे सांगितले की, 'भाजपने बनावट मतांच्या माध्यमातून दिल्ली आणि महाराष्ट्र विधानसभा निवडणुका जिंकल्या. निवडणूक आयोगाने यामध्ये मदत केली. त्या म्हणाल्या की, भाजपने निवडणूक आयोगाच्या मदतीने बनावट मतदारांना यादीत समाविष्ट केले.

भाजप नेत्यांनी निवडणूक आयोगाच्या कार्यालयात बसून ऑनलाइन बनावट मतदार यादी तयार केली आहे. त्यांनी पश्चिम बंगालच्या प्रत्येक जिल्ह्यात बनावट मतदारांची भर घातली आहे. बहुतेक मतदार गुजरात आणि हरियाणातील आहेत. महाराष्ट्र आणि दिल्लीतील विरोधी पक्षांना ही वस्तुस्थिती कळू शकली नाही. त्या म्हणाल्या, मी बंगालच्या लोकांना मतदार यादी तपासण्याचे आवाहन करते. कोणत्याही दिवशी एनआरसी आणि सीएएच्या नावाखाली खऱ्या मतदारांची नावे वगळली जाऊ शकतात. असे करून, भाजपचे लोक कसे तरी तृणमूल काँग्रेसला हरवू इच्छितात.

गरज पडल्यास मतदार यादी दुरुस्त करण्यासाठी आणि बनावट मतदार काढून टाकण्यासाठी निवडणूक आयोगाच्या कार्यालयासमोर धरणे आंदोलन करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. जर मी नंदीग्राममध्ये २६ दिवसांचे उपोषण करू शकते, तर मी निवडणूक आयोगाविरुद्ध आंदोलन देखील सुरू करू शकते.

अमेरिकेतून भारतीयांना साखळदंडांनी बांधून परत पाठवल्याबद्दल ममता बॅनर्जी यांनी केंद्र सरकारचा निषेध केला.

# हमीभावापेक्षा कमी किंमतीत सोयाबीनची खरेदी...

**अकोला :** सोयाबीनची शासकीय खरेदी बंद झाल्यानंतर हमीभावाचा वादा करणारे सरकार झोपले काय असा प्रश्न आता संतप्त शेतकरी विचारत आहे. हमीभावापेक्षा कमी दरात बाजार समितीत सोयाबीन खरेदी केला जात आहे. हा शेतकऱ्यांवर अन्याय असून याकडे लोकप्रतिनिधींचे दूर्लक्ष आहे. सोयाबीनची शासन खरेदी बंद करण्यात आल्यानंतर सोयाबीनच्या दरात पुन्हा घसरण झालेली आहे. गत एक महिन्यात सोयाबीनच्या दरात प्रतिक्विंटल हजार रुपयांनी घसरण झाली आहे. सोयाबीनला हमीभाव ४८९२ रुपये असताना बाजार समित्यांमध्ये त्या पेक्षा कमी दरात सोयाबीन खरेदी होत आहे. इतकेच नाही तर सोयाबीनसोबतच हरभऱ्याच्या दरातही घसरण झाली आहे. हरभऱ्याचे गेल्यावर्षीच्या तुलनेत एक हजाराने कमी दरआहेत. अकोला कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये यंदा हरभऱ्याला ५५०० रुपये क्विंटलचा भाव मिळत आहे, तर मागील वर्षी ६५०० रुपये प्रतिक्विंटल मिळाला होता. खरीप हंगामातील प्रमुख पीक असून, लाखो हेक्टरवर पेरणी करण्यात येते. यावर्षी सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या पाठीमागे संकटे कायम आहे. काही शेतकरी दरवाढीच्या प्रतीक्षेत सोयाबीनची साठवणूक करत आहेत. काहींनी बाजारपेठत सोयाबीन आणले असून त्याला मात्र भाव मिळत नसल्याची ओरड शेतकरी करत आहे. भारतापेक्षा विदेशात ढेपची मागणी जास्त असते. यावर्षी विदेशात ढेपला मागणी नाही. तसेच शासनाचे निर्यात धोरणही सोयाबीनचे भाव कमी होण्यास कारणीभूत ठरत आहे. नाफेडद्वारा उशिराने खरेदी सुरू करण्यात आल्याने अडचणीतील शेतकऱ्यांना मिळेल त्या भावात सोयाबीन विकावे लागले.

# पाणलोट रथ यात्रेच्या माध्यमातून जिल्हाभरात जनजागृती





■बाशीटाकळी तालुक्यातील घोटा येथे २६ फेब्रुवारी रोजी झालेल्या पाणलोट यात्रेला सरपंच मायाताई सोनोने , तर पाराभवानी येथे सुषमा महेंद्र इंगोले आदी उपस्थित होते. पथनाट्याद्वारे माती व जल संवर्धनाचे महत्व सांगण्यात आले. वृक्षारोपण, भुमिपुजन व लोकार्पण कार्यक्रम घेण्यात आले. पाणलोट क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणा-या धरणीताई व पाणलोट योद्धा यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. गावाचा विकास करण्यासाठी जलसंधारणाच्या विविध योजनां मध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात आले.

## सोनाळा येथे पाणलोट यात्रेचे उत्साहात स्वागत

■**अकोला,दि.२७ (प्रतिनिधी):** केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत मृद व जलसंधारण विभागांतर्गत राबविण्यात येत आहे. अकोला जिल्ह्यासह राज्यातील ३० जिल्ह्यात पाणलोट रथ यात्रा सुरु आहे. जिल्ह्यातील सोनाळा येथे पाणलोट रथ यात्रेचे भव्य स्वागत करण्यात आले. यावेळी खासदार अनुप धोत्रे यावेळी उपस्थित होते. जलसंधारणाचे महत्व गावोगाव पोहोचविण्यासाठी यात्रेचा उपक्रम उपयुक्त असल्याचे खासदार श्री. धोत्रे यांनी यावेळी सांगितले. सरपंच महानाम फुलके , वृक्षप्रेमी ए.एस.नाथन,जिल्हा जलसंधारण अधिकारी अमोल मस्कर, उपविभागीय जलसंधारण अधिकारी सचिन वानरे उपविभागीय जलसंधारण अधिकारी राम ठोके उपविभागीय जलसंधारण अधिकारी सचिन गवई, जलसंधारण अधिकारी प्रियंका पांडे आदी उपस्थित होते.बोरगाव मंजू येथील रथ यात्रेला उपविभागीय अधिकारी डॉ. शरद जावळे, सरपंच अनिता खेडकर,पोलिस निरिक्षक अनिल गोपाळ जलसंधारण विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

# जिल्हाधिकारी कार्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा



■**अकोला,दि.२७ (प्रतिनिधी):** घेऊ या एकच वसा,मराठीला बनवू ज्ञानभाषा हा संदेश देत जिल्हाधिकारी कार्यालयातील लोकशाही सभागृहात मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला.अमृतातही पैजा जिंकणाऱ्या मराठी भाषेचा वापर प्रत्येकाने संवादासाठी करणे गरजेचे असून मराठी भाषेचे संवर्धन करण्याची जबाबदारी आपल्या प्रत्येकाची असल्याची भावना साहित्यिक मयुर लहाने यांनी केली. ते 'मराठी भाषा संवर्धन काळाची गरज ' या विषयावर आयोजित व्याख्यानात बोलत होते.यावेळी तहसीलदार गौरी धायगुडे सहा.पुरवठा अधिकारी अर्चना निमजे,जेष्ठ साहित्यिक जिल्हा मराठी भाषा समिती सदस्य सुरेश पाचकवडे,डॉ. विनय दांदळे,शाम ठक आदी उपस्थित होते.ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त कवी कुसुमाग्रज यांच्या जन्मदिवसानिमित्त शासनातर्फे मराठी भाषा गौरव दिन साजरा केला जातो. या कार्यक्रमाला विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# सरपंच पती,लागला एसीबीच्या हाती आणि बायकोच्या राजकीय आयुष्याची केली माती...

■**अकोला,दि.२७ (प्रतिनिधी):** जिल्ह्याच्या मूर्तिजापूर तालुक्यातील सालतवाडा ग्रामपंचायतीच्या सरपंच पतीने गावातीलच एका व्यक्तीला ग्रामपंचायत रेकॉर्डला बक्षीस पत्राची नोंद करण्याच्या कामासाठी १००० रुपयांची लाचेची मागणी करून ती स्वीकारल्याने तो अकोला एसीबीच्या हाती लागला आहे. यातील तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीची पडताळणी केली असता सत्यता आढळून आल्याने आज दिनांक २६/२/२०२५ व दिनांक २७/२/२०२५ रोजी सापळा कारवाई आयोजित करण्यात आली होती.

आज सायंकाळी आरोपी सरपंच पती देवानंद गणपत जामनिक, वय ५७ वर्ष, व्यवसाय शेतमजुरी रा ग्राम उमई, पोस्ट-जांभा बु.ता.मुर्तिजापुर जि. अकोला (खाजगी इसम) यांस तक्रारदारा कडून पंचांसमक्ष लाचेची रक्कम स्वीकारताच त्याला एसीबीच्या पथकाने रंगेहाथ पकडले आहे. प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशी आहे की, यातील तकारदार यांनी दिनांक २६/०२/२०२५ रोजी एसीबी कार्यालय अकोला येथे तकार दिली की,तक्रारदार यांच्या वडिलांनी त्यांच्या नावे ग्राम सालतवाडा ता. मुर्तिजापुर जि. अकोला येथील विटा सिमेंटचे पक्के बांधकाम केलेले घर बक्षीसपत्रान्वये तकारदार यांचे नावावर केले आहे. सदर बक्षीस पत्राची नोंद ग्राम पंचायत अभिलेखावर होवुन घराचा नमुना ८ अ मिळणेकामी तकारदार यांनी सदर बक्षीसपत्राची एक झेरॉक्सप्रत सालतवाडा गट ग्रामपंचायत येथे दिलेली आहे. गट ग्रामपंचायत सालतवाडा येथील महीला सरपंच सौ.सिमा देवानंद जामनिक यांचे सर्व काम त्यांचा पती गैरअर्जदार देवानंद जामनिक पाहत असल्याने तकारदार हे सरपंच पती गैरअर्जदार देवानंद जामनिक याला भेटले व सदर बक्षिसपत्राची नोंद ग्रामपंचायत अभिलेखावर करून घराचा नमुना ८ अ देण्यास विनंती केली. त्यावर सरपंच पती देवानंद जामनिक याने तक्रारदारला ३,००० रूपये लाच रकमेची मागणी करीत आहेत.

अशा आशयाची तकारदार दिली. सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २६/०२/२०२५ रोजी आंबेडकर चौक, एस.टी. स्टॅन्ड, मुर्तिजापुर येथे शासकिय पंचासमक्ष पडताळणी कार्यवाही केली असता, गैरअर्जदार देवानंद जामनिक याने बक्षीसपत्राची नोंद ग्रामपंचायत अभिलेखावर करून घराचा नमुना ८ अ देण्याकरीता सरपंच पती गैरअर्जदार देवानंद जामनिक याने तडजोडी नंतर १,००० रूपये लाच मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

## थोडक्यात

### काळवीटाचे मांस वाटणी करताना तिघांवर वनविभागाची कारवाई

**बाळापूर :** वाडेगाव येथे वन्यप्राणी काळवीटाची शिकार करून मृतक काळविटाचे मांसाची वाटणी करतांना वन विभागाला सोमवार दि. २४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५.३० वाजता वन विभागाने कारवाई करण्यात आली आहे. भारतीय वन अधिनियम १९२६ व वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ चे नुसार प्राप्त अधिकाराचा वापर करून वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांनी झडती वॉरंट द्वारा वाडेगाव येथील इंदिरा नगर येथील सुनील रामेकर, विवेक वानखेडे, दिपक मोकडकर तिघेही रा. इंदिरा नगर वाडेगाव ता. बाळापूर जी अकोला यांचे घराची झाडाझडती घेतली असता, त्यांच्या राहत्या घरात एक काळवीट शिकार करुन दीपक मोकडकर यांचे घरी मांसाची हिसेवाटणी करत असताना रंगेहात पकडण्यात आले. त्या आरोपी जवळून वन्यप्राणी काळवीट चे मांस अंदाजे १.५ कि. लो. मांस कापण्याचे सुरा/ विळा व दोन मोबाईल असे साहित्यही जप्त करण्यात आले. तसेच आरोपीची वैद्यकीय तपासणी करून पुढील तपास वन विभाग करीत आहेत. त्या तीनही आरोपींना मंगळवार दि. २५ फेब्रुवारी रोजी विद्यमान न्याय दंडाधिकारी बाळापूर यांच्या समोर हजर केले असता त्या तीनही आरोपींना मंगळवार दि. २५ फेब्रुवारी ते शनिवार दि. १ मार्च पर्यंत वन कोठडी सुनावली आहे. ही कार्यवाही मा. उपवनसंरक्षक डॉ कुमारस्वामी, मा. सहाय्यक वनरक्षक (भ.व) सचिन खणे यांचे मार्गदर्शनात वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) व्ही. आर. थोरात यांचे अधिनस्त वनकर्मचारी वनपाल अनिता बेलसरे, सुभाष काटे, सोपान रेळे, अनिरुद्ध चौधरी, अर्जुन शेलार, अक्षय खंडारे, सागर पल्हाडे, रिजवान खान, तुषार आवारे यासह इतर वनकर्मचारयांनी केली. सदर माहिती वन विभागाच्या सूत्रांकडून प्राप्त झाली आहे. वन्यप्राणी चे शिकारी करतांना, किंवा त्यांना त्रास देताना कोणी आढळून आल्यास तसेच जंगलास अंगार लावताना कोणी दिसल्यास त्वरित शासनाच्या टोल फ्री क्रमांक १९२६ वर संपर्क करून सदरच्या गुन्हाबद्दल किंवा अपप्रकाराबद्दल माहिती द्यावी आपले नाव गुप्त ठेवण्यात येईल असेही आवाहन वन विभागा मार्फत करण्यात आले आहे.

### पक्ष्यांसाठी चारपाण्याची व्यवस्था

**अकोला :** दरवर्षी उन्हाळ्यात मुक्या जनावर अन पाखरांना पाण्यासाठी भटकंती करावी लागते. भूतदया दाखवित अनेकांनी उन्हाळ्यात पक्ष्यांसाठी पाण्याचे पात्र लावण्याचा उपक्रम विविध स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून सुरु केला आहे. मात्र येथील निसर्गप्रेमी शेख मुन्ना हे आपल्या खर्चातून दरवर्षी पक्ष्यांसाठी अन्न आणि पाणी दोन्ही एकाच ठिकाणी मिळतील अशा पात्राची निर्मिती करतात. मागील दहा वर्षांपासून त्यांचा हा उपक्रम सुरु असून यंदाही त्यांनी पक्ष्यांसाठी पात्र बनविणे सुरू केले आहे. उन्हाळ्याची दाहकता आता जाणवू लागली असून शहरातील तापमानाचा पारा दिवसेंदिवस चढताना दिसून येत आहे. अकोला जिल्हा उष्णतेसाठी विशेष प्रसिद्ध असून येथील तापमान दरवर्षी ४० ते ४५ अंशापेक्षा अधिक दिसून येते. अशात मुक्या प्राण्यांसह पक्ष्यांची पाण्यासाठी भटकंती होते. अन्न- पाण्यासाठी त्यांना भटकंती करावी लागत असल्यामुळे उन्हाळ्यात अनेक संस्था, व्यक्तींकडून पक्ष्यांसाठी पाण्याची व्यवस्था करण्यात येते.

# शहरातील थकित मालमत्ता धारकांनी शास्ती अभय योजनेचा लाभ घ्यावा : मनपा आयुक्त

■**अकोला,दि.२७ (प्रतिनिधी):** अकोला महानगरपालिका क्षेत्रातील थकित मालमत्ता धारकांना त्यांचा थकित कराचा भरणा करणे अधिक सोईचे व्हावे याकरिता मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनील लहाने यांच्या आदेशान्वये २० जानेवारी ते ३१ मार्च २०२५ या कालावधीमध्ये (ब्याज माफी) अर्थात शास्ती अभय योजना सुरू करण्यात आली आहे. या अभय योजने अंतर्गत शास्तीच्या (व्याजच्या) रकमेत ९० टक्के सूटचे आज शेवटचे दिवस असून नागरिकांनी थकित कराची रकमेचा भरणा एकरकमी करून या संधीचा लाभ घ्यावा.१ मार्च ते १५ मार्च २०२५ या कालावधीमध्ये थकीत कराचा भरणा केल्यास शास्तीच्या रकमेमध्ये ८० टक्के सूट देण्यात येणार आहे.आणि १६ मार्च ते ३१ मार्च या कालावधीमध्ये थकीत करण्याचा भरणा केल्यास शास्तीच्या रकमेमध्ये ७५ टक्के सूट देण्यात येणार आहे.तरी शहरातील सर्व मालमत्ता धारकांनी आपला थकीत व चालू वर्षातील मालमत्ता कराचा भरणा एकरकमी करून जप्ती व लिलावा सारख्या अप्रिय कारवाई टाळून प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन अकोला महानगरपालिका प्रशसनाव्दारा करण्यात येत आहे.

# संत सेवा घडणं हे परम भाग्याचं लक्षण : ह.भ.प पुरुषोत्तम महाराज देहूकर

## ■कालवाडी क्षेत्री संतांच्या मुर्त्यांचा प्राण प्रतिष्ठा सोहळा



■**अकोट,दि.२७ (प्रतिनिधी):** संतजन हे आपले मायबाप आहेत. त्यांची सेवा घडणं हे भाग्याचं लक्षण आहे.कालवाडी सारख्या छोट्याशा गांवात संतकृपेने तुकोबारायांचं मंदीर उभारुन प्रति देहूचे मान मिळाला. हे या गांवांचं परम भाग्य आहे.तुकोबारायाची अशीच सेवा घडत राहो ही सेवा आपल्या इच्छा आकांक्षा पुर्ण केल्याशिवाय राहणार नाही असा आशीर्वाद जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज संस्थान देहूचे अध्यक्ष तथा तुकोबांचे वंशज ह भ प पुरुषोत्तम महाराज मोरे यांनी ग्रामस्थांना दिला

विदर्भाचे देहू म्हणून प्रख्यात असलेल्या श्री क्षेत्र कालवाडी येथील श्री संत तुकाराम महाराज मंदिरात संतांच्या संगमवरी मुर्त्यांचा प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात पुरुषोत्तम महाराज बोलत होते. या प्रसंगी श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प. वासुदेवराव महल्ले, उपाध्यक्ष बाबाराव बिहाडे, ज्येष्ठ सहकार नेते रमेश हिंगणकर, विश्वस्त अवि गावंडे ह भ प विष्णु महाराज गावंडे आदी उपस्थित होते

याप्रसंगी संस्थेच्या वतीने 'धन्य आम्ही तुका देखीयेला' या भक्तीभावाने संतजन अथितींचे स्वागत ह.भ.प.अनंत महाराज यांनी केले.संत वासुदेव महाराजांचे प्रेरणेने व वै पंजाबराव हिंगणकर यांचे पुढाकाराने उभारलेल्या या मंदिराचा नुकताच जिणीद्धार करण्यात आला असून श्री संत ज्ञानेश्वर महाराज, श्री संत गजानन महाराज, श्री संत भास्कर महाराज, व श्री संत वासुदेव महाराज, बैरागी बुवांच्या पादुकाचा पुन; प्राणप्रतिष्ठा तथा शिवलिंग व नंदीकेश्वरांची नव्याने प्राणप्रतिष्ठा पुरुषोत्तम महाराज मोरे यांच्या हस्ते पार पडली. दरम्यान विधिवत पूजा अर्च्या होम हवन पार पडले. पुजेचे पौरोहित्य अनिल महाराज राजवैद्य यांनी केले.प्रा.गजानन हिंगणकर, सुधाकरराव हिंगणकर,प्रदिप हिंगणकर यांचे हस्ते संतांची विधीवत पुजा पार पडली. होमहवन व आरतीत यजमान म्हणून रामु धांडे, ज्ञानेश्वर हिंगणकर, दत्तात्रय हिंगणकर,जय मोहोड, संदीप हिंगणकर,शुभम मोहोड,,गोपाल हिंगणकर प्रविण जकाते ,विजय हिंगणकर, अमोल हिंगणकर, प्रफ्फुल्ल हिंगणकर यांनी सहभाग घेतला.दुस-या दिवशी महाप्रसादाने या भक्ती सोहळ्याची सांगता झाली.या भक्ती सोहळ्यात गांवकरी सहभागी झाले होते.

# अल्पसंख्याक उमेदवारांना प्रशिक्षणासाठी इच्छूक संस्थांनी अर्ज करावेत

## नियोजन कार्यालयाचे आवाहन

■**अकोला,दि.२७ (प्रतिनिधी):** अल्पसंख्याक समुदायातील उमेदवारांना समान संधी, शासकीय सेवेत, तसेच पोलीस दलात निवड होण्याच्या अनुषंगाने प्रशिक्षण देण्यात येणार आहे. उमेदवारांना निवासी पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण योजनेत प्रशिक्षण देऊ इच्छिणा-या संस्थांनी जिल्हा नियोजन अधिका-यांकडे तत्काळ अर्ज करावेत.

असे आवाहन करण्यात आले आहे.किमान २५ ते कमाल ५० प्रशिक्षणार्थींना निवासी पोलीस शिपाई भरतीपूर्व परीक्षेसाठी प्रशिक्षण देण्याची सुविधा संस्थेकडे असावी. विद्यार्थ्यांकडून गणित, सामान्यज्ञान, बुद्धिमत्ता चाचणी, मराठी भाषा यासह शारिरीक चाचणीसाठी सराव करून घेणे अपेक्षित आहे. त्यासाठी अनुभवी प्रशिक्षक असावेत.ग्रंथालय, वाचनालय, स्वच्छतागृहे, ५० प्रशिक्षणार्थींसाठी निवास खोल्या, मैदान, महिला उमेदवारांसाठी स्वतंत्र- सुरक्षित व्यवस्था आदी बाबी असणे आवश्यक आहे. ५० प्रशिक्षणार्थींसाठी निवास, अभ्यास साहित्य, प्रशिक्षण, अल्पोपहार, भोजन आदींसाठी १२ लक्ष २ हजार ५०० रू अनुदान अनुज्ञेय आहे. त्यानंतर २५ टक्के अनुदान दोन महिने प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर व उर्वरित २५ टक्के अनुदान प्रशिक्षित उमेदवार प्रत्यक्षात पोलीस भरतीच्या चाचणीस उपस्थित असल्याचा पुरावा सादर केल्यानंतर जिल्हाधिका-यांमार्फत प्रशिक्षण संस्थांना अदा करण्यात येतील.

# शिवर येथील शिवमंदिरात पाच हजार दिव्यांची आरास

■**अकोला,दि.२७ (प्रतिनिधी):** श्री शिव चॅरिटेबल ट्रस्ट शिवर व्दारा संचालीत जागृत श्री शिव मंदिरात महाशिवरात्रीचे औचित्य साधून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी सकाळी पंडित रतनजी तिवारी यांच्या हस्ते मंदीरातील पिंडीचा सामुहिक अभिषकाचा व महादेवाच्या पिंडीचा नामकरण सोहळा पार पडला. याप्रसंगी मंदीरातील महादेवाच्या पिंडीला त्यांच्या हस्ते श्री महाकालेश्वर शिवालय नाव देण्यात आले. याप्रसंगी श्री महाकालेश्वराच्या जयघोषाने यावेळी परीसर दुमदुमला होता. यानंतर सामुहिक आरती तसेच विविध पुजनाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी भाविक भक्तांना फराळाचे वितरण करण्यात आले. यानंतर मुक्ताई महीला हरीपाठ भजनी मंडळाच्या महीलांनी बहारदार भक्तीगितांचे सादरीकरण करुन मंत्रमुग्ध करुन टाकले. संध्याकाळी गावातील भाविकांनी स्वयंस्फूर्तीने मंदीरात पाच हजारांहून अधिक दिवे लाऊन दिपोत्सवाचा कार्यक्रम पार पाडला. यावेळी दिव्यांनी मंदीराचा परीसर उजळून निघाला होता.

# आर्ट ऑफ लिविंग अकोलाच्या रजत वर्षानिमित्त रविवारी भव्य भजन संध्या

## आंतरराष्ट्रीय भजनकार विक्रम हाजरा गाणार भजने



■**अकोला,दि.२७ (प्रतिनिधी):** लाखो भक्तांचे तारणहार श्री श्री रविशंकर यांच्या आर्ट ऑफ लिविंग परिवार अकोलाच्या वतीने रविवार दिनांक २ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता गांधी रोड वरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर खुले नाट्यगृह येथे भव्य भजन संध्याचे आयोजन करण्यात आले आहे.या भजन संध्येत आर्ट ऑफ लिविंग चे आंतरराष्ट्रीय भजनकार व पॉप गायक विक्रम हाजरा हे भजन संध्या सादर करणार आहेत. आर्ट ऑफ लिविंग अकोला शाखेच्या रजत जयंती निमित्त हा उपक्रम साकार करण्यात आला आहे. जागतिक ग्लोबल वार्मिंग वर विशेष वैश्विक उपक्रम राबविणारे श्री श्री रविशंकर यांच्या मार्गदर्शनात जगभरात आर्ट ऑफ लिविंगचे विविध लोकोपयोगी व कल्याणकारी उपक्रम सुरू असून अकोला जिल्ह्यातही जलयुक्त शिवार, नदीचा गाळ काढणे व उन्हाळ्याच्या दिवसात पाण्याचे दुर्भिक्ष असणाऱ्या गावांना आरो पाणी वितरित करणे आदी उपक्रम आर्ट ऑफ लिविंग अकोला परिवाराच्या वतीने सातत्याने करण्यात येत आहेत. सुंदर अकोला हरित अकोला हे ब्रीद घेऊन आर्ट ऑफ लिविंगचा स्थानिक परिवार अनेक कल्याणकारी उपक्रम त्याचबरोबर अनेक शिबिरे,सुदर्शन क्रिया, श्रमदान,स्वच्छता अभियान आदी उपक्रम राबवित आहे. महानगरात आयोजित भजन संध्येतील विक्रम हाजरा हे आर्ट ऑफ लिव्हिंगच्या आंतरराष्ट्रीय परिवारातील ख्यातनाम गायक,भजनकार व संगीत निर्माते म्हणून प्रसिद्ध असून आहेत.आर्ट ऑफ लिविंग च्या माध्यमातून आतापर्यंत त्यांनी ५० राष्ट्रात लंडन ते जोहान्सबर्ग पर्यंत आपल्या आधुनिक दर्जाच्या संगीताने युक्त जागतिक संगीत शैलीच्या माध्यमातून आगळावेगळा भजन संध्येचा कार्यक्रम सादर केला आहे. त्यांच्या आधुनिक पॉप संगीत संध्या या गाजल्या असून पंडित चौरसिया व श्री श्री रविशंकर यांच्या समवेतही त्यांनी आपले दर्जेदार भजन कार्यक्रम सादर केले आहेत. आर्ट ऑफ लिविंग च्या वतीने आयोजित या भजन संध्येचा महिला पुरुष साधकांनी लाभ घ्यावा असे अवाहन आर्ट ऑफ लिविंगचे डीटीसी सदस्य, शिक्षकगण व स्वयंसेवकांच्या वतीने करण्यात आले.

# आरटीई प्रवेशासाठी आज अतिम मुदत

## ■२६ तारखेपर्यंत ७१३ पाल्यांचे प्रवेश निश्चित




■**अकोला,दि.२७ (प्रतिनिधी):** मोफत शिक्षण हक्क अधिनियम अकोला २००९ अन्वये जिल्ह्यातील १९१ खासगी विनाअनुदानित शाळांमध्ये गरीब व गरजू समाजातील मुलांना २५ टक्के जागांवर प्रवेश देण्याची तरतूद करण्यात आली आहे. याअंतर्गत जिल्ह्यातील १९१ शाळांमध्ये राखीव असलेल्या १९९२ जागांसाठी ६०३६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १९६८ विद्यार्थ्यांची आरटीई अंतर्गत निवड झाली असून निवड झालेल्या विद्यार्थ्यांची कागदपत्रे तपासून प्रवेश निश्चित करण्याची प्रक्रिया २८ फेब्रुवारीपर्यंत आहे. आतापर्यंत जिल्ह्यातील ७१३ पाल्याचे प्रवेश निश्चित झाले असून १२५५ मुलांचे प्रवेश बाकी आहेत.बालकांचा मोफत शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ नुसार, अल्पसंख्याक शाळा वगळता मान्यताप्राप्त खासगी प्राथमिक शाळांमध्ये वंचित, दुर्बल आणि गरजू विद्यार्थ्यांसाठी इयत्ता पहिली किंवा पूर्व प्राथमिक वर्गात २५ टक्के आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे.

मागील शैक्षणिक सत्र २०२४- २५ साठी शिक्षण हक्क अंतर्गत प्रवेश प्रक्रियेस चुकीच्यानिर्णयामुळे, नंतर न्यायालयीन प्रकरणांमुळे आणि पुनर्विचारामुळे विलंब झाला. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले. त्यामुळेयावेळी डिसेंबर २०२४ पासून शाळांची नोंदणी सुरू झाली.

जानेवारी महिन्यापासून विद्यार्थ्यांची नोंदणी सुरू झाली. यानंतर फेब्रुवारी किंवा महिन्यात प्रवेशाची लॉटरी जाहीर करण्यात आली. त्यामुळे यंदा प्रथमच जून-जुलै महिन्यात संपूर्ण प्रवेश प्रक्रिया पूर्ण होणार आहे. परिणामी आरटीई अंतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे वर्गही नियमित वेळेत सुरूहोतील.

शुक्रवारी लॉटरी पद्धतीने निवड करण्यात आलेल्या पाल्यांना प्रवेश घेण्यासाठी अंतिम मुदत देण्यात आली आहे. बुधवार, २६ फेब्रुवारी पर्यंत ७१३ पाल्यांचे प्रवेश निश्चित झाले होते.

# गावांच्या समृद्धीसाठी जलसंवर्धन आवश्यक

**अकोला :** जलसंवर्धनातूनच सिंचन व कृषी उत्पादकता वाढेल. खेडीपाडी समृद्ध होतील. त्यामुळे गावोगाव पाणलोट व्यवस्थापन व्हावे, असे आवाहन बाळापूरचे उपविभागीय अधिकारी अनिरूद्ध बक्षी यांनी केले. पाणलोट यात्रेचे पातूर तालुक्यातील पिंपरडोळी येथे सोमवारी स्वागत करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. सरपंच गंगासागर ताजने, अनिलबाबा देशमुख, नायब तहसीलदार तेलगोटे, राम ठोके, वानरे, आर. इंगळे आदी उपस्थित होते. प्रारंभी जि. प. शाळेच्या विद्यार्थ्यांच्या सहभागातून प्रभातफेरी काढण्यात आली. यानिमित्त निबंध व चित्रकला स्पर्धेतील गुणवंतांना बक्षीसवितरण झाले. रूक्मिणी स्वयंसहायता गट, वैष्णवी स्वयंसहायता गट, संघर्ष स्वयंसहायता गट यांचे स्टॉलही यात्रेनिमित्त लावण्यात पथनाट्याद्वारे जनजागृती, वृक्षारोपण करण्यात आले. पाणलोट योद्धयांचा सत्कारही यावेळी झाला.

# सोमवारी महानगरात मोफत श्रवण तपासणी शिबिराचे आयोजन

■**अकोला,दि.२७ (प्रतिनिधी):** सामाजिक व मानवी सेवेत सक्रिय असणाऱ्या इनरव्हील क्लब ऑफ अकोला क्वीन तथा वसंत हॉस्पिटल कीर्ती नगर यांच्या संयुक्त विद्यमाने महानगरात मोफत श्रवण तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.



जागतिक श्रवण दिनावर आयोजित हे शिबिर सोमवार दिनांक ३ मार्च रोजी सकाळी १० वाजता किर्ती नगर परिसरातील जुन्या आरटीओ रस्त्यावरील वसंत हॉस्पिटल, ताम्हणे हॉस्पिटल येथे हे एक दिवसीय मोफत श्रवण तपासणी शिबिर होणार आहे. या शिबिरात कान,नाक,घसा तज्ञ डॉ. पराग डोईफोडे तथा श्रवण तज्ञ डॉ स्वप्निल गारडे हे रुग्ण तपासणी करून रुग्णांना यथोचित मार्गदर्शन करणार आहेत. या शिबिराची रुग्ण नोंदणी सुरू असून रुग्णांनी ९०८२४७२०१७ यावर संपर्क करण्याचे आवाहन इनरव्हील क्लब ऑफ अकोला कवीन्सच्या अध्यक्ष रुची रुहाटीया, सचिव सोनल सकलेचा, कोषाध्यक्ष दीपिका शाह,आयएसओ कल्याणी पवित्रकार,सीसी अंकिता सोनी समवेत वसंत हॉस्पिटल कीर्ती नगरच्या वैद्यकीय वर्गाने केले आहे.

# मोदींची 'डुबकी' अन् अमेरिकेची 'दादागिरी'!

**भारतीयांचे अमेरिकेशी असलेले संबंध अतिशय चांगले आहेत. त्यातच डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेची सत्ता पहिल्यांदा ताब्यात घेतली, तेव्हापासून तर आजतागायत आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व ट्रम्प यांच्यात मधुर संबंध होते. त्याचाच परिणाम म्हणून पहिल्यांदा ट्रम्प अमेरिकेचे अध्यक्ष झाल्यावर त्यांना भेटायला गेलेल्या मोदींचे जंगी स्वागत झाले होते. ट्रम्प यांच्यासमोरच 'मोदी मोदी' असा गजर देशातील प्रसारमाध्यमांनी दाखविला होता. दोघांच्या गळाभेटीचे फोटो भारतीय प्रसार माध्यमांनी पहिल्या पानावर व विविध वाहिन्यांवर प्रसिद्ध केले होते.**

**भारतीयांनी तर डोनाल्ड ट्रम्प यांना अतिशय आदराची अशी 'तात्या' नावाची उपाधी देऊन टाकली होती. 'तात्या' या नावामध्ये एक विशेष आदर असतो. पण दुसऱ्यांदा अध्यक्ष झाल्यानंतर हेच 'तात्या' केव्हा 'तात्या विंचू' बनले हे लक्षात पण आले नाही. मोदी सरकार कुंभ मेळ्यामध्ये आंघोळ करण्यात व्यस्त असतांनाच भारतीयांच्या हातापायात बेड्या घालून डोनाल्ड ट्रम्प मिरवणूक काढत असल्याचे वेदनादायी चित्र देशाने पाहीले. विशेष म्हणजे ज्यांच्या हातापायात बेड्या घातल्या होत्या, तेच 'हाऊ डी मोदी वाले' होते. मोदी अमेरिकेत आले की घसा ताणून 'मोदी मोदी' ओरडणारेच खाली माना घालून भारतात परत आले.**

**आम्ही उद्याच्या हिंदू राष्ट्राचे पाईक आहोत, मोदी निवडून आल्यावर आम्हाला कसली काळजी? अशीच भूमिका असलेले अनेक जण 'बेडीधारी' बनले होते. या सगळ्या लोकांना सी-१७ या अमेरिकी सैन्य विमानाने भारतात पाठवण्यात आले. या सर्वांना हातकड्या घालून विमानात बसवतानाचा व्हिडीओही व्हायरल झाला आहे. पंजाबच्या अमृतसर येथील श्री गुरु रामदास जी आंतरराष्ट्रीय विमानतळावर सी-१७ लँड झाले, त्यावेळी अनेकांच्या डोळ्यात पाणी तरळत होते. अमेरिकेतील निवडणुकीपूर्वी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इतिसातील सर्वात मोठी हद्दपारी करण्याचे आश्वासन दिले होते. त्यामुळे अनेक देशांमध्ये घबराट पसरली होती. परंतु त्याची सुरुवात भारतापासूनच केली जाईल, यावर मात्र विश्वास बसत नाही. सर्वात पहिला मोठा घाला भारतीयांवर केला आणि ट्रम्प यांच्या बाबतीत सर्वांचाच भ्रमनिरास झाला.**



जगभरात वेगवेगळे देश गृहयुद्ध, नैसर्गिक आपत्ती यामुळे देशातून बाहेर पडलेल्या लोकांना आश्रय देतात. त्यांना निर्वासित म्हटले जात. कायदेशीररीत्या तेही बेकायदेशीरपणे अमेरिकेत आलेले असल्याने त्यांचीही हकालपट्टी करण्यास सुरूवात झाली आहे. निवडणुकीपूर्वी अमेरिकेच्या लोकांना दिलेले आश्वासन ट्रम्प यांनी पूर्ण करायला सुरुवात केली असे म्हटले जाते.

यावर अमेरिकेतील नागरिक खुश असले तरी जगभरातील देशातून अमेरिकेवर टिकेचा भडीमार सुरू झाला. इमिग्रेशन आणि कस्टम एन्फोर्समेंटने १५ लाख अवैध स्थलांतरितांची यादी तयार केली. त्यात १८ हजार भारतीय आहेत. सर्वांना आपापल्या देशात पाठविण्याचे काम सुरु झाले आहे. त्यातील २०५ भारतीयांना अमृतसर येथे सोडण्यात आले. अमेरिकेपासून केलेला प्रवास केवळ शारीरिकदृष्ट्या दुःखदायक नव्हता, तर मानसिकदृष्ट्याही थकवणारा होता.?

अमेरिकी विमानाने येणाऱ्या सर्व लोकांच्या कागदपत्रांची अमृतसर विमातळावर तपासणी करण्यात आली. इमीग्रेशनशिवाय गुन्हेगारी रेकॉर्ड तपासले जात होते. गुन्हेगारी रेकॉर्ड आढळले, तर विमानतळावरच त्यांना ताब्यात घेण्यात येणार असल्याचे कळते. सुमारे चाळीस तास हातापायांना बेड्या घालून सर्वांना साखळ्यांनी बांधून ठेवले होते. त्यांच्या जागेपासून एक इंचही त्यांना हलू दिले जात नव्हते. त्याबाबतची व्यथा हरविंदर सिंग नावाच्या एका अमेरिकेतून आलेल्या प्रवाशाने सांगीतल्यावर संताप आल्याशिवाय राहील का?

भारतीयांना परत आणण्यासाठी नरेंद्र मोदी यांनी कोलंबिया प्रमाणे आपले विमान का पाठवले नाही? पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रयागराजला गंगेत पवित्र डुबकी घेत होते. गंगाविहारचा आनंद घेत होते. सारा मीडिया त्यांच्या मागे धावत होता. पंतप्रधान डुबकी कशी घेतात याचं रसभरीत वर्णन करीत होता. त्याच वेळेस अमेरिकन लष्कराचं विमान अमृतसरच्या गुरू रामदासजी आंतरराष्ट्रीय विमानतळावर लँन्ड होत होतं.

कोणताही स्वाभिमानी देश परकीय लष्करी विमानाला आपल्या भूमीवर उतरण्याची अनुमती देत नाही. तसं करणं देशाच्या सार्वभौमत्वालाच आव्हान मानलं जातं. या संदर्भात कोलंबियाचे राष्ट्राध्यक्ष गुस्तावो पेट्रो यांनी दाखविलेला बाणेदारपणा जगाच्या नजरेत भरावा असाच होता. अमेरिकेत बेकायदेशीर वास्तव्य करणाऱ्या कोलंबियन नागरिकांना घेऊन जेव्हा अमेरिकन लष्करी विमान निघाले, तेव्हा गुस्तावो पेट्रो यांनी ते विमान आपल्या भूमीवर उतरण्याची परवानगी नाकारली. आर्थिक निर्बंध लादण्याची अमेरिकेने धमकी दिल्यानंतरही पेट्रो जरासेही विचलित झाले नाहीत. आपल्या भूमीकेवर ठाम राहिले.

आपले विमान पाठवून त्यांनी आपल्या नागरिकांना सन्मानाने मायदेशी आणले. हा असतो राष्ट्रवाद. हा असतो स्वाभिमान, आपण काय केलं? हातात बेड्या ठोकलेल्या अवस्थेत, अत्यंत अपमानीत पध्दतीने १०४ भारतीयांना अमेरिकेने आपल्या लष्करी विमानातून भारतात पाठवून दिलं. आपणही असहाय्यपणे अमेरिकेच्या लष्करी विमानाला भारताच्या भूमीवर उतरण्याची परवानगी दिली. कोलंबिया सारखा एक छोटा देश जो स्वाभिमान दाखवू शकतो, तसा स्वाभिमान भारताला का दाखवता आला नाही?

या सगळ्या विषयावर मोदी मौन बाळतीलच. उलट ही बातमी भारतीयांना समजणार नाही याची काळजी घेतली गेली. जिथं विमान उतरलं तिकडं मीडियाला फिरू दिलं नाही. शिवाय प्रयागराज भेटीचा मुहूर्त नरेंद्र मोदी यांनी यासाठी निवडला की, मीडियाचे लक्ष अमेरिकन लष्करी विमानाच्या लँन्डिंगकडे जाताच कामा नये. त्यात नरेंद्र मोदी यशस्वी झाले.?

मीडियावर अमेरिकन 'दादागिरी'ची नाही तर नरेंद्र मोदींच्या 'डुबकी'चीच चर्चा दिवसभर सुरू होती.? असं म्हणतात की, जंग जंग पछाडल्यानंतर देखील डोनाल्ड ट्रम्प यांच्या शपथविधी सोहळ्यास नरेंद्र मोदी यांना अमेरिकेने निमंत्रित केलं नाही. असे असले तरीही नरेंद्र मोदी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना आपले मित्र मानतात. पण त्यावर आक्षेप घेण्याचे काहीच कारण नाही. पण पंतप्रधानांनी आपल्या मित्राला किमान भारतीयांना बेड्या ठोकून पाठवू नका अशी विनंती का केली नाही? हा प्रश्न निर्माण झाला आहे. अमेरिकेच्या या कृत्याबद्दल त्यांचा निषेध करण्याची हिंमत भारत दाखविणार आहे का?

थर्ड अम्पायर



जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

जागतिक शक्ती होण्याची स्वप्न भारतीयांना दाखविणा-या सरकारने आज देशाची मान शरमेनं खाली जाईल अशीच कचखाऊ भूमिका घेतली आहे. अमेरिकेतील एका कार्यक्रमात आपले पंतप्रधान नरेंद्र मोदींनी 'अब की बार ट्रम्प सरकार' अशी घोषणा दिली होती. त्याला हसतमुखाने प्रतिसाद देत डोनाल्ड ट्रम्प यांनी मोदींचे हात हातात घेऊन, 'हाऊडी माय फ्रेंड्स', असे म्हणाले होते. पण त्याच ट्रम्प यांनी मोदींच्या भारतीय नागरिकांचा नको तेवढा पाणउतारा केला. याबाबत परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर चौकशी करणार होते. परंतु तत्पूर्वीच अमेरिकेने भारतीयांचा गाशा गुंडाळला.

अमेरिकेत बेकायदेशीरपणे राहणाऱ्या लोकांना त्यांच्या कायद्याने 'घुसखोर' ठरवून ज्याच्या त्याच्या देशात बळजबरीने पाठवून दिलेलं आहे. कोलंबियाच्या राष्ट्रपतींनी अमेरिकन सैनिकी विमानाला त्यांच्या देशात उतरण्याची परवानगी नाकारली. त्या ऐवजी त्यांनी स्वतःचं विमान पाठवून लोकांना परत आणलं. भारताला हे का नाही करता आल नाही? इकडे पोहोचल्यावरही मीडियाला त्यांच्यापासून दूर का ठेवलं? त्यांच्या स्वागताला कोणीही का गेलं नाही? त्यांना कैद्यांसारखं का येऊ दिलं?

पंतप्रधान इकडे डुबक्या मारण्यात बिझी होते. अमित शहा नेहमी म्हणत होते की जगात कुठेही गेलात की विचारतात की, 'आप मोदी के देश से आए है? मग त्याच मोदींच्या देशातील नागरिकांना गुन्हेगाराप्रमाणे वागणूक का देण्यात आली? याचे उत्तर शहांनी दिले पाहिजे. अर्थात ट्रम्प यांनी दुसऱ्यांदा अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाची शपथ घेतली आणि पहिल्याच दिवशी तब्बल ४२ निर्णयांवर स्वाक्षरी केली. तसेच काही तासातच त्यांनी बायडन सरकारचे ७८ निर्णय एका दमात रद्द केलेत. जागतिक आरोग्य संघटनेमधून अमेरिका बाहेर पडल्यावर कोरोना काळामध्ये चीन आणि डब्ल्यूएचओवर ट्रम्प यांनी गंभीर आरोप केले होते. डब्ल्यूएचओमध्ये अमेरिका सर्वाधिक निधी देणारा देश होता. याशिवाय आजघडीला जवळपास तीन लाख भारतीय विद्यार्थी अमेरिकेत वास्तव्य करत आहेत. त्याचबरोबर अमेरिकेत कामासाठी दिला जाणारा एच १ बी व्हिसा मिळवणाऱ्यांमध्ये भारतीयांची संख्या मोठी आहे. इतर कोणत्याही देशातील नागरिकांपेक्षा अमेरिकेत राहणाऱ्या भारतीयांचं प्रमाण अधिक आहे. मात्र, त्यापैकी तब्बल वीस हजार भारतीयांना हद्दपारीचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे.

■ ■

### भारतापुढे नवीन आव्हाने उभी राहणार

राष्ट्राध्यपदाची शपथ घेतल्यापासून ट्रम्प धडाकेबाज निर्णय घेत आहेत. त्यांच्या निर्णयाने जगातील अनेक देश हादरले आहेत. त्यामुळे भारतापुढेही नवीन आव्हाने उभी राहिली आहेत. ट्रम्प यांचे धोरण अमेरिका फर्स्ट हेच दिसते. अमेरिकन नागरिकांचे हित सर्वोच्च असल्याचे त्यांनी जगाला ठणकावून सांगितले आहे. अमेरिकेतील जनता देखील त्यांच्या या निर्णयावर बेहद्द खूष झाली आहे. अमेरिकेत जन्मल्यावर स्थलांतरीच्या मुलांना आपोआप मिळणारं नागरिकत्व रद्द करण्यापासून ते बेकायदेशीर स्थलांतर रोखण्यापर्यंतच्या निर्णयांवर ट्रम्प यांनी राष्ट्राध्यक्ष म्हणून पहिल्याच दिवशी स्वाक्षऱ्या केल्या. पण त्याची इतकी तातडीने अंमलबजावणी करतील असे वाटले नव्हते. त्याचा भारतावर निश्चितच परिणाम होऊ शकतो. अमेरिकेबरोबर व्यापार वाढविण्याचा भारत प्रयत्न करीत असताना अमेरिकेने टेरिफ लावल्यास भारतापुढे अनंत अडचणी उभ्या राहील्या आहेत. भारत, ब्राझील, रशिया, चीन व दक्षिण ऑफ्रिका यांनी अमेरिकन डॉलर ऐवजी दुस?्या कोणत्याही चलनाला समर्थन दिले त्यावर शंभर टक्के टेरिफ लावले जाईल, असे ट्रम्प यांनी जाहीर केले आहे. तसेच बेकायदेशीर स्थलांतरिताच्या विरोधात कारवाई करण्याची तयारी ट्रम्प यांनी पहिल्या दिवसापासूनच तयारी सुरू केली. त्याचा परिणाम २० हजार भारतीयांची अमेरिकेतून घरवापसी होऊ शकते.

### ट्रम्प यांची बेधडक निर्णयास सुरुवात

भारतीयांना गुन्हेगार समजून बेड्या घालून अमेरिकन लष्करी विमानाने भारतात सोडले, याबद्दल मोदी चकार शब्दही बोलणार नाही किंवा तक्रारी करणार नाही हे निश्चित. पण विरोधी पक्षही झोपा काढतात की मोदींप्रमाणे कुंभमेळ्यात रमले की काय? असा प्रश्न विचारला जात आहे. अमेरिकेत एक कोटीपेक्षा जास्त लोक बेकायदा राहत आहेत. बेकायदा घुसखोरी हा निवडूक प्रचारात महत्त्वाचा मुद्दाही होता. ट्रम्प सरकारच्या नव्या धोरणानुसार हंगामी म्हणजे एच १ बी व्हीसा मिळवून अमेरिकेत राहणारे किंवा ग्रीन कार्ड मिळविण्यासाठी जे प्रतीक्षेत आहेत, त्यांना अमेरिकन नागरिकत्व मिळवणे आता कठीण होणार आहे. याबरोबरच ट्रम्प अध्यक्ष झाल्याबरोबर वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन मधूनही त्यांनी माघार घेतली. जागतिक पातळीवर मात्र ही घोडचूक असल्याचे बोलले जाते. कारण वैश्विक आरोग्याची काळजी घेणे आणि जेव्हा कोरोना सारख्या किंवा इतर साथीचे आजार पसरतात, तेव्हा एका देशातून दुसऱ्या देशामध्ये गतीने हे आजार पसरून कोट्यावधी लोकांच्या जीवाशी संबंधित असा हा भाग आहे. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनने दारिद्र रेषेखालील देशांना अतिशय मोठी मदत आजपर्यंत केलेली आहे. जगभर वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन बद्दल असंख्यानी कृतज्ञता व्यक्त केली आहे. देवीचा आजार, स्मॉल पॉक्स, फिट, एचआयव्ही असे गंभीर आजार या संघटनेमुळेच संयमीत राहिले. असे असूनही ट्रम्प असे अनेक बेधडक निर्णय घेत आहे.

# विद्यार्थी मित्रांनो... विज्ञानाकडे वळा!

भारतात दरवर्षी २८ फेब्रुवारीला राष्ट्रीय विज्ञान दिवस चंद्रशेखर वेंकट रामन यांच्या सन्मानार्थ साजरा केला जातो. विज्ञानाच्या फायद्यांबद्दल समाजात जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि वैज्ञानिक वृत्ती निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय विज्ञान व तंत्रज्ञान परिषद आणि विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाच्या अंतर्गत राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो. रामन इफेक्टचा शोध लागल्याने राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो. या शोधाची घोषणा भारतीय शास्त्रज्ञ सर चंद्रशेखर वेंकटरामन यांनी २८ फेब्रुवारी १९२८ रोजी केली होती. या शोधाबद्दल त्यांना १९३० मध्ये नोबेल पारितोषिक देण्यात आले होते.

---

सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. वसंतराव गोवारीकर सन १९८७ साली भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान खात्याचे सचिव असताना त्यांनी ज्या अनेक योजना सुरू केल्या त्यातील एक योजना म्हणजे देशात विज्ञानाचे वातावरण निर्माण करण्यासाठी दरवर्षी २८ फेब्रुवारीला राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करणे. डॉ. वसंतराव गोवारीकरांच्या मनात आले की भारतात विज्ञानाचा एकमेव नोबेल पुरस्कार डॉ.सी.व्ही.रामन यांना मिळाला आहे, तर त्यांच्याशी संबंधितच तो दिवस असावा. शिवाय तो त्यांचा जन्म अथवा मृत्युदिन निवडण्यापेक्षा त्यांनी ज्या दिवशी त्यांचा निबंध जगप्रसिद्ध नेचर या विज्ञान मासिकाला पाठवला आणि ज्याला पुढे सन १९३० साली नोबेल पुरस्कार मिळाला ती तारीख का निवडू नये? अखेर जी तारीख निघाली ती २८ फेब्रुवारी ही होय.

डॉ. सी. व्ही. रमन यांचा जन्म तामिळनाडूमधील तिरुचिरापल्ली आणि शिक्षण चेन्नई येथे झाले. त्यांनी कोलकाता विद्यापीठात १९१७-१९३३ भौतिकशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम केले. डॉ. रमन हे काही काळ बंगलोरातही होते, १९४७ साली ते रमन संशोधन संस्थेचे संचालक झाले. त्यांचे ६ मे १९०७ रोजी लोकासुंदरी अम्मलबरोबर लग्न झाले होते. त्यांना चंद्रशेखर आणि रेडिओ-खगोलशास्त्रज्ञ राधाकृष्णन हे दोन पुत्र होते. डॉ. रमन हे चंद्रशेखर सुब्रह्मण्यन यांचे काका होते.

१९८३ मध्ये चंद्रशेखर यांना भौतिकशास्त्रातील नोबेल पारितोषिक मिळाले. त्यांनी आयुष्यभर दगड व अन्य खनिज पदार्थांचे विस्तृत वैयक्तिक संग्रह जमा केला आणि या खनिजांच्या प्रकाश-विकिरणाच्या गुणधर्मांचा अभ्यास केला. यासाठी त्यांना काही साहित्य देशभरातून व विदेशातून भेट म्हणून मिळाले. नमुन्यांचा अभ्यास करण्यासाठी डॉ. सी. व्ही. रमन अनेकदा लहान हाताळण्याएवढा स्पेक्ट्रोस्कोप घेऊन जात असत. रमन पदवीधर विद्यार्थी असताना १९०६ साली त्यांचा पहिला संशोधन पेपर प्रकाशित झाला. पुढच्या वर्षी त्यांनी एमएची पदवी मिळवली. कोलकाता येथील इंडियन फायनान्स सर्व्हिसमध्ये असिस्टंट अकाउंटंट जनरल म्हणून रुजू झाले, तेव्हा ते १९ वर्षांचे होते. तेथे त्यांची इंडियन असोसिएशन फॉर द अप्लाइन्शन ऑफ सायन्स- आयएसएस या भारतातील पहिल्या संशोधन संस्थेशी ओळख झाली, ज्यामुळे त्यांना स्वतंत्र संशोधन करण्याची परवानगी मिळाली आणि ध्वनी आणि ऑप्टिक्समध्ये त्यांनी मोठे योगदान दिले.

रमन यांनी आयुष्यभर दगड व अन्य खनिज पदार्थांचे विस्तृत वैयक्तिक संग्रह जमा केला आणि या खनिजांच्या प्रकाश-विकिरणाच्या गुणधर्मांचा अभ्यास केला. ऑक्टोबर १९७० च्या शेवटी रमण त्यांच्या प्रयोगशाळेत कोसळले; त्यांना रुग्णालयात हलविण्यात आले आणि डॉक्टरांनी त्यांना चार दिवस जगण्यासाठी मुदत दिली. ते वाचले आणि काही दिवसांनी त्यांनी रुग्णालयात राहण्यास नकार दिला, कारण त्यांनी त्यांच्या अनुयायांनी वेढलेल्या त्यांच्या संस्थेच्या बागेमध्ये मरणे पसंत केले.

रमनच्या मृत्यूच्या दोन दिवस आधी त्यांनी आपल्या एका माजी विद्यार्थ्यास सांगितले, अकादमीच्या नियतकालिकांना मरण येऊ देऊ नका, ते देशात विज्ञानाच्या गुणवत्तेचे संवेदनशील संकेतक आहेत. ती संध्याकाळ, रमन यांनी आपल्या संस्थेच्या व्यवस्थापन मंडळाशी भेट घेण्यात आणि त्यांच्याबरोबर संस्थेच्या व्यवस्थापनासंबंधी कार्यवाहीबद्दल त्यांच्याशी चर्चा करण्यात घालवली.

२१ नोव्हेंबर १९७०च्या रात्रीनंतर रमन यांचा दुसऱ्या दिवशी पहाटे नैसर्गिक कारणांमुळे मृत्यू झाला. १९१७ मध्ये कलकत्ता विद्यापीठाच्या राजाबाजार विज्ञान महाविद्यालयात आशुतोष मुखर्जी यांनी त्यांना भौतिकशास्त्राचे पहिले पालित प्राध्यापक म्हणून नियुक्त केले. आपल्या पहिल्या युरोप दौऱ्यात भूमध्य समुद्र पाहून त्याला समुद्राच्या निळ्या रंगाचे वर्णन करण्याची प्रेरणा मिळाली. त्यांनी १९२६ मध्ये इंडियन जर्नल ऑफ फिजिक्सची स्थापना केली. त्याने आणि कृष्णन यांनी २८ फेब्रुवारी १९२८ रोजी प्रकाश विखुरल्याची एक अभिनव घटना शोधून काढली, ज्याला त्यांनी सुधारित विखुरणे असे संबोधले, पण त्याला रामन परिणाम म्हणून ओळखले जाते.

भारत सरकारतर्फे दरवर्षी राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून हा दिवस साजरा केला जातो. रमन सन १९३३ साली बेंगळुरू येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये पहिले भारतीय संचालक बनले. तेथे त्यांनी त्याच वर्षी इंडियन अकॅडमी ऑफ सायन्सेसची स्थापना केली. त्यांनी १९४८ साली रमन रिसर्च इन्स्टिट्यूटची स्थापना केली. तेथे त्यांनी शेवटच्या काळात काम केले. त्यांच्या रमन परिणाम- प्रकाशाचे मॉलिक्युलर स्कॅटरिंग या शोधासाठी ते ओळखले जातात. १९३० चे भौतिकशास्त्राचे नोबेल पारितोषिक रमन यांना मिळाले होते.

मानवी कल्याणासाठी विज्ञान क्षेत्रात सर्व क्रियाकलाप, प्रयत्न आणि कृत्ये प्रदर्शित करणे. सर्व विषयांवर चर्चा करण्यासाठी आणि विज्ञान क्षेत्रात विकासासाठी नवीन तंत्रज्ञानाची अंमलबजावणी करण्यासाठी हे साजरे केले जाते. देशातील वैज्ञानिक विचारांच्या नागरिकांना संधी देणे. लोकांना प्रोत्साहित करण्यासाठी तसेच विज्ञान आणि तंत्रज्ञान लोकप्रिय करण्यासाठी.

राष्ट्रीय विज्ञान दिनाचे मूळ उद्दिष्ट विद्यार्थ्यांना विज्ञानाकडे आकर्षित करणे आणि त्यांना प्रेरित करणे आणि विज्ञान आणि वैज्ञानिक कामगिरीबद्दल लोकांना जागृत करणे हा आहे. विज्ञानाशिवाय विकासाचा मार्ग वेगाने पुढे जाऊ शकत नाही.

विज्ञान गैरसमज आणि अंधश्रद्धा नष्ट करते. विज्ञान आणि तंत्रज्ञान प्रसिद्ध करण्यासोबतच देशातील नागरिकांना या क्षेत्रात संधी देऊन नवीन उंची गाठणे हा त्याचा मुख्य उद्देश आहे. देशाच्या विकासासाठी वैज्ञानिक विचारांचा प्रसार आवश्यक आहे. विज्ञानाच्या माध्यमातूनच आपण समाजातील लोकांचे जीवनमान अधिकाधिक सुखी करू शकतो. विज्ञानाच्या फायद्यांबद्दल समाजात जागरूकता निर्माण करणे आणि वैज्ञानिक वृत्ती निर्माण करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो. राष्ट्रीय आणि इतर विज्ञान प्रयोगशाळा, विज्ञान अकादमी, शाळा आणि महाविद्यालये आणि प्रशिक्षण संस्था यासारख्या सर्व विज्ञान संस्थांमध्ये या दिवशी विविध वैज्ञानिक उपक्रमांशी संबंधित कार्यक्रम आयोजित केले जातात.

महत्त्वाच्या कार्यक्रमांमध्ये भाषणे, निबंध, शास्त्रज्ञांचे लेखन, विज्ञान प्रश्नमंजुषा, विज्ञान प्रदर्शन, परिसंवाद आणि परिसंवाद इत्यादींचा समावेश होतो. विज्ञान क्षेत्रातील विशेष योगदानासाठी राष्ट्रीय आणि इतर पुरस्कारही जाहीर केले जातात. विज्ञानाची लोकप्रियता वाढवण्यासाठी विशेष पुरस्कारही ठेवण्यात आले आहेत. राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या समस्त भारतीयांना हार्दिक शुभेच्छा !!

---

संकलन व सुलेखन
कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे
गडचिरोली.
७७७५०४१०८६.

■ ■ ■

# सेन्सॉर बोर्डाला माहिती नाही नामदेव ढसाळ कोण?

मराठी साहित्य विश्वातील क्रांतिकारी कवी तथा दलित पँथर चळवळीचे संस्थापक नामदेव ढसाळ यांच्या जीवनावर आधारित 'चल हल्ला बोल' हा चित्रपट सेन्सॉर बोर्डाच्या कात्रीत सापडला आहे. सेन्सॉर बोर्डाने या चित्रपटाला परवानगी नाकारल्यामुळे चित्रपट निर्माते व दिग्दर्शक जुलै 2024 पासून बोर्डाच्या दारात चकरा मारत आहेत.

'चल हल्ला बोल' हा चित्रपट नामदेव ढसाळ यांच्या जीवनावर आधारित आहे. मराठी व हिंदी भाषेतील या 2 तासांच्या चित्रपटाद्वारे 1970 ते 1975 च्या कालखंडातील युवा क्रांती दल व दलित पँथरच्या चळवळीवर प्रकाश टाकण्यात आला आहे. या चित्रपटाला जगभरातील 262 फिल्म फेस्टिव्हलमध्ये नामांकन मिळाले आहे. त्याला अनेक पुरस्कारही मिळालेत. पण भारतातच सेन्सॉर बोर्डाने त्याला परवानगी नाकारल्यामुळे निर्माते हैरान झाले.

सेन्सॉर बोर्डाचे अधिकारी रेवणकर व सय्यद रबी हश्मी यांनी निर्मात्यांना पाठवलेल्या एका नोटीसीत नामदेव ढसाळ कोण हेच आम्हाला माहिती नसल्याचा अजब दावा केला आहे. त्यांच्या कविता चित्रपटातून वगळल्या तर सेन्सॉर बोर्ड चित्रपटाला परवानगी देण्यावर विचार करू शकतो, असे त्यांनी म्हटले. बोर्डाच्या या भूमिकेमुळे चित्रपट निर्माते बुचकळ्यात पडलेत. हा चित्रपटच मुळात नामदेव ढसाळ यांच्या जीवनावर आधारित असल्यामुळे त्यांच्या कविता कशा वगळणार? असा विचित्र प्रश्न त्यांच्यापुढे उभा टाकला आहे.






नामदेव ढसाळ यांच्याशिवाय हा चित्रपट अपूर्ण आहे. त्यांच्या कविता या चित्रपटाच्या आत्मा आहेत, असे चित्रपट निर्माते महेश बनसोडे या प्रकरणी म्हणाले. चित्रपट प्रदर्शित होण्यास विलंब होत असल्यामुळे निर्मात्यांना मोठे आर्थिक नुकसान सोसावे लागत असून, त्यांनी कायदेशीर लढा देण्याचे संकेत दिलेत. दुसरीकडे, सोशल मीडियावरही या प्रकरणी तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. अनेकजण या प्रकरणी सेन्सॉर बोर्ड अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी करत असल्याचा आरोप करत आहेत. ■ ■

### कोण होते नामदेव ढसाळ?

नामदेव ढसाळ (15 फेब्रुवारी 1949 - 15 जानेवारी 2014) हे मराठी साहित्यातील एक थोर कवी, लेखक आणि सामाजिक कार्यकर्ते होते. पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील पूर गावात जन्मलेल्या ढसाळ यांनी मुंबईच्या गोलपीठा परिसरातील कठोर जीवनातून प्रेरणा घेत गोलपीठा (1973) हा पहिला कवितासंग्रह लिहिला. या संग्रहाने साहित्यविश्वात खळबळ माजली. त्यांच्या विद्रोही कवितांनी दलितांचे दुःख आणि व्यवस्थेविरुद्धचा राग प्रभावीपणे मांडला. त्यांनी 1972 मध्ये ज. वि. पवार यांच्यासह दलित पँथर ही संघटना स्थापन केली, जी जातिव्यवस्थेविरुद्ध लढणारी आक्रमक चळवळ ठरली. ढसाळ यांना 1999 मध्ये पद्मश्री आणि 2004 मध्ये साहित्य अकादमीचा जीवनगौरव पुरस्कार मिळाला.

# पपई खाऊन बिया फेकू नका



आरोग्यासाठी फायदेशीर असलेल्या फळांचा विचार केला तर पपई सर्वप्रथम लक्षात येते. हे केवळ पचनसंस्थेसाठीच फायदेशीर नाही तर रोगप्रतिकारशक्ती वाढविण्यास, त्वचा आतून हेल्दी ठेवण्यास आणि वजन कमी करण्यास देखील मदत करते. मात्र पपई खाल्ल्यानंतर अनेकजण त्याच्या बिया फेकून देतात. पण पपईच्या बिया औषधी गुणधर्मांनी समृद्ध आहेत.

पपईच्या बिया आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरू शकतात. या बियांमध्ये अँटीऑक्सिडंट्स, फायबर, जीवनसत्त्वे आणि खनिजे असतात जी शरीराला डिटॉक्सिफाई करण्यास आणि आरोग्याच्या विविध समस्यांपासून संरक्षण करण्यास मदत करतात.

**पपईच्या बियांचे फायदे :** पपईच्या बिया तुमच्या शरीरातील किडनी आणि लिव्हरला डिटॉक्सीफाई करण्यास मदत करतात. तसेच शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकण्यास आणि निरोगी ठेवण्यास मदत करतात. पपईच्या बियांमध्ये पपेन नावाचे एंजाइम असते, जे अन्न पचवण्यास मदत करते. त्यामुळे पोटातील आतड्यांसंबंधी कृमी काढून टाकण्यासाठी आणि बद्धकोष्ठता दूर करण्यासाठी देखील ते प्रभावी आहेत.

पपईच्या बियांमध्ये ओमेगा-3 फॅटी ॲसिड असते, जे खराब कोलेस्ट्रॉल कमी करून हृदय निरोगी ठेवण्यास मदत करतात. पपईच्या बियांमध्ये फायबर भरपूर प्रमाणात असते, वजन कमी करण्यासाठी तुम्ही पपईच्या बियांचा आहारात समावेश करू शकतात.

पपईच्या बियांमध्ये असलेले अँटीऑक्सिडंट्स शरीराची प्रतिकार क्षमता वाढविण्यास मदत करतात, ज्यामुळे रोगांचा धोका कमी होतो. स्मूदी बनवताना पपईच्या बियांचा वापर करू शकता. यासाठी प्रथम पपईच्या बिया वाळवून त्यांची बारीक पूड करून घ्या, त्यानंतर तुम्ही जेव्हा स्मूदी बनवता तेव्हा त्यात पपईच्या बियांची पूड मिक्स करून त्याचे सेवन करा. सलाडचे सेवन करताना तुम्ही त्यात पपईच्या बिया देखील मिक्स करू शकता. प्रथम पपईच्या बिया वाळवून घ्या. नंतर हलके भाजून सलाडमध्ये मिक्स करून सेवन करा. पपईच्या बियांचे सेवन केल्याने शरीर डिटॉक्सीफाई होण्यास मदत होते. पाण्यात उकळून घ्या. नंतर ते पाणी एका पेल्यात गाळून प्या. यामुळे शरीर डिटॉक्सीफाई होण्यास मदत होईल.

■ ■ ■

अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### विज्ञान दिन

रुढींना पहावं तपासून
विज्ञानाच्या कसोटीवर
तरच देश
राहील प्रगतीपथावर..!

डोळस दृष्टीकोनानेच
अंधश्रध्देवर होईल मात
जनजागरणा साठी
घ्यावी विज्ञानाची साथ..

अशिक्षीतां पेक्षा
सुशिक्षीतच चाललाय
अंधश्रध्देच्या आहारी
यापेक्षा दुर्देव
कोणते श्रीहरी?

## हमीभावापेक्षा कमी किंमतीत सोयाबीनची खरेदी...

**अकोला :** सोयाबीनची शासकीय खरेदी बंद झाल्यानंतर हमीभावाचा वादा करणारे सरकार झोपले काय असा प्रश्न आता संतप्त शेतकरी विचारत आहे. हमीभावापेक्षा कमी दरात बाजार समितीत सोयाबीन खरेदी केला जात आहे. हा शेतकऱ्यांवर अन्याय असून याकडे लोकप्रतिनिधींचे दूर्लक्ष आहे. सोयाबीनची शासन खरेदी बंद करण्यात आल्यानंतर सोयाबीनच्या दरात पुन्हा घसरण झालेली आहे. गत एक महिन्यात सोयाबीनच्या दरात प्रतिक्विंटल हजार रुपयांनी घसरण झाली आहे. सोयाबीनला हमीभाव ४८९२ रुपये असताना बाजार समित्यांमध्ये त्या पेक्षा कमी दरात सोयाबीन खरेदी होत आहे. इतकेच नाही तर सोयाबीनसोबतच हरभऱ्याच्या दरातही घसरण झाली आहे. हरभऱ्याचे गेल्यावर्षीच्या तुलनेत एक हजाराने कमी दरआहेत. अकोला कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये यंदा हरभऱ्याला ५५०० रुपये क्विंटलचा भाव मिळत आहे, तर मागील वर्षी ६५०० रुपये प्रतिक्विंटल मिळाला होता. खरीप हंगामातील प्रमुख पीक असून, लाखो हेक्टरवर पेरणी करण्यात येते. यावर्षी सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या पाठीमागे संकटे कायम आहे. काही शेतकरी दरवाढीच्या प्रतीक्षेत सोयाबीनची साठवणूक करत आहेत. काहींनी बाजारपेठत सोयाबीन आणले असून त्याला मात्र भाव मिळत नसल्याची ओरड शेतकरी करत आहे. भारतापेक्षा विदेशात ढेपची मागणी जास्त असते. यावर्षी विदेशात ढेपला मागणी नाही. तसेच शासनाचे निर्यात धोरणही सोयाबीनचे भाव कमी होण्यास कारणीभूत ठरत आहे. नाफेडद्वारा उशिराने खरेदी सुरू करण्यात आल्याने अडचणीतील शेतकऱ्यांना मिळेल त्या भावात सोयाबीन विकावे लागले.

## पाणलोट रथ यात्रेच्या माध्यमातून जिल्हाभरात जनजागृती





### सोनाळा येथे पाणलोट यात्रेचे उत्साहात स्वागत

**▪अकोला, दि.२७ (प्रतिनिधी):** केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत मृद व जलसंधारण विभागांतर्गत राबविण्यात येत आहे. अकोला जिल्ह्यासह राज्यातील ३० जिल्ह्यात पाणलोट रथ यात्रा सुरु आहे. जिल्ह्यातील सोनाळा येथे पाणलोट रथ यात्रेचे भव्य स्वागत करण्यात आले. यावेळी खासदार अनुप धोत्रे यावेळी उपस्थित होते. जलसंधारणाचे महत्व गावोगाव पोहोचविण्यासाठी यात्रेचा उपक्रम उपयुक्त असल्याचे खासदार श्री. धोत्रे यांनी यावेळी सांगितले. सरपंच महानाम फुलके, वृक्षप्रेमी ए.एस.नाथन, जिल्हा जलसंधारण अधिकारी अमोल मस्कर, उपविभागीय जलसंधारण अधिकारी सचिन वानरे उपविभागीय जलसंधारण अधिकारी राम ठोके उपविभागीय जलसंधारण अधिकारी सचिन गवई, जलसंधारण अधिकारी प्रियंका पांडे आदी उपस्थित होते. बोरगाव मंजू येथील रथ यात्रेला उपविभागीय अधिकारी डॉ. शरद जावळे, सरपंच अनिता खेडकर, पोलिस निरिक्षक अनिल गोपाळ जलसंधारण विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

▪बाशीटाकळी तालुक्यातील घोटा येथे २६ फेब्रुवारी रोजी झालेल्या पाणलोट यात्रेला सरपंच मायाताई सोनोने, तर पाराभवानी येथे सुषमा महेंद्र इंगोले आदी उपस्थित होते. पथनाट्याद्वारे माती व जल संवर्धनाचे महत्व सांगण्यात आले. वृक्षारोपण, भुमिपुजन व लोकार्पण कार्यक्रम घेण्यात आले. पाणलोट क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणा-या धरणीताई व पाणलोट योद्धा यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. गावाचा विकास करण्यासाठी जलसंधारणाच्या विविध योजनां मध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात आले.

## जिल्हाधिकारी कार्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा

**▪अकोला, दि.२७ (प्रतिनिधी):** घेऊ या एकच वसा, मराठीला बनवू ज्ञानभाषा हा संदेश देत जिल्हाधिकारी कार्यालयातील लोकशाही सभागृहात मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. अमृतातही पैजा जिंकणाऱ्या मराठी भाषेचा वापर प्रत्येकाने संवादासाठी करणे गरजेचे असून मराठी भाषेचे संवर्धन करण्याची जबाबदारी आपल्या प्रत्येकाची असल्याची भावना साहित्यिक मयुर लहाने यांनी केली. ते 'मराठी भाषा संवर्धन काळाची गरज ' या विषयावर आयोजित व्याख्यानात बोलत होते. यावेळी तहसीलदार गौरी धायगुडे सहा. पुरवठा अधिकारी



अर्चना निमजे, जेष्ठ साहित्यिक जिल्हा मराठी भाषा समिती सदस्य सुरेश पाचकवडे, डॉ. विनय दांदळे, शाम ठक आदी उपस्थित होते. ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त कवी कुसुमाग्रज यांच्या जन्मदिवसानिमित्त शासनातर्फे मराठी भाषा गौरव दिन साजरा केला जातो. या कार्यक्रमला विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## सरपंच पती, लागला एसीबीच्या हाती आणि बायकोच्या राजकीय आयुष्याची केली माती...

**▪अकोला, दि.२७ (प्रतिनिधी):** जिल्ह्याच्या मूर्तिजापूर तालुक्यातील सालतवाडा ग्रामपंचायतीच्या सरपंच पतीने गावातीलच एका व्यक्तीला ग्रामपंचायत रेकॉर्डला बक्षीस पत्राची नोंद करण्याच्या कामासाठी १००० रुपयांची लाचेची मागणी करून ती स्वीकारल्याने तो अकोला एसीबीच्या हाती लागला आहे. यातील तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीची पडताळणी केली असता सत्यता आढळून आल्याने आज दिनांक २६/२/२०२५ व दिनांक २७/२/२०२५ रोजी सापळा कारवाई आयोजित करण्यात आली होती.

आज सायंकाळी आरोपी सरपंच पती देवानंद गणपत जामनिक, वय ५७ वर्ष, व्यवसाय शेतमजुरी रा ग्राम उमई, पोस्ट-जांभा बु.ता.मुर्तिजापुर जि. अकोला (खाजगी इसम) यांस तक्रारदारा कडून पंचांसमक्ष लाचेची रक्कम स्वीकारताच त्याला एसीबीच्या पथकाने रंगेहाथ पकडले आहे. प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशी आहे की, यातील तकारदार यांनी दिनांक २६/०२/२०२५ रोजी एसीबी कार्यालय अकोला येथे तकार दिली की, तक्रारदार यांच्या वडिलांनी त्यांच्या नावे ग्राम सालतवाडा ता. मुर्तिजापुर जि. अकोला येथील विटा सिमेंटचे पक्के बांधकाम केलेले घर बक्षीसपत्रान्वये तकारदार यांचे नावावर केले आहे. सदर बक्षीस पत्राची नोंद ग्राम पंचायत अभिलेखावर होवुन घराचा नमुना ८ अ मिळणेकामी तकारदार यांनी सदर बक्षीसपत्राची एक झेरॉक्सप्रत सालतवाडा गट ग्रामपंचायत येथे दिलेली आहे. गट ग्रामपंचायत सालतवाडा येथील महीला सरपंच सौ.सिमा देवानंद जामनिक यांचे सर्व काम त्यांचा पती गैरअर्जदार देवानंद जामनिक पाहत असल्याने तकारदार हे सरपंच पती गैरअर्जदार देवानंद जामनिक याला भेटले व सदर बक्षिसपत्राची नोंद ग्रामपंचायत अभिलेखावर करून घराचा नमुना ८ अ देण्यास विनंती केली. त्यावर सरपंच पती देवानंद जामनिक याने तक्रारदारला ३,००० रूपये लाच रकमेची मागणी करीत आहेत.

अशा आशयाची तकारदार दिली. सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २६/०२/२०२५ रोजी आंबेडकर चौक, एस.टी. स्टॅन्ड, मुर्तिजापुर येथे शासकिय पंचासमक्ष पडताळणी कार्यवाही केली असता, गैरअर्जदार देवानंद जामनिक याने बक्षीसपत्राची नोंद ग्रामपंचायत अभिलेखावर करून घराचा नमुना ८ अ देण्याकरीता सरपंच पती गैरअर्जदार देवानंद जामनिक याने तडजोडी नंतर १,००० रूपये लाच मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

## थोडक्यात

### काळवीटाचे मांस वाटणी करताना तिघांवर वनविभागाची कारवाई

**बाळापूर :** वाडेगाव येथे वन्यप्राणी काळवीटाची शिकार करून मृतक काळविटाचे मांसाची वाटणी करतांना वन विभागाला सोमवार दि. २४ फेबुवारी रोजी सायंकाळी ५.३० वाजता वन विभागाने कारवाई करण्यात आली आहे. भारतीय वन अधिनियम १९२६ व वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ चे नुसार प्राप्त अधिकाराचा वापर करून वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांनी झडती वॉरंट द्वारा वाडेगाव येथील इंदिरा नगर येथील सुनील रामेकर, विवेक वानखेडे, दिपक मोकडकर तिघेही रा. इंदिरा नगर वाडेगाव ता. बाळापूर जी अकोला यांचे घराची झाडाझडती घेतली असता, त्यांच्या राहत्या घरात एक काळवीट शिकार करुन दीपक मोकडकर यांचे घरी मांसाची हिसेवाटणी करत असताना रंगेहात पकडण्यात आले. त्या आरोपी जवळून वन्यप्राणी काळवीट चे मांस अंदाजे १.५ कि. लो. मांस कापण्याचे सुरा/ विळा व दोन मोबाईल असे साहित्यही जप्त करण्यात आले. तसेच आरोपीची वैद्यकीय तपासणी करून पुढील तपास वन विभाग करीत आहेत. त्या तीनही आरोपींना मंगळवार दि. २५ फेबुवारी रोजी विद्यमान न्याय दंडाधिकारी बाळापूर यांच्या समोर हजर केले असता त्या तीनही आरोपींना मंगळवार दि. २५ फेबुवारी ते शनिवार दि. १ मार्च पर्यंत वन कोठडी सुनावली आहे. ही कार्यवाही मा. उपवनसंरक्षक डॉ कुमारस्वामी, मा. सहाय्यक वनरक्षक (भ.व) सचिन खणे यांचे मार्गदर्शनात वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) व्ही. आर. थोरात यांचे अधिनस्त वनकर्मचारी वनपाल अनिता बेलसरे, सुभाष काटे, सोपान रेळे, अनिरुद्ध चौधरी, अर्जुन शेलार, अक्षय खंडारे, सागर पल्हाडे, रिजवान खान, तुषार आवारे यासह इतर वनकर्मचारयांनी केली. सदर माहिती वन विभागाच्या सूत्रांकडून प्राप्त झाली आहे. वन्यप्राणी चे शिकारी करतांना, किंवा त्यांना त्रास देताना कोणी आढळून आल्यास तसेच जंगलास अंगार लावताना कोणी दिसल्यास त्वरित शासनाच्या टोल फ्री क्रमांक १९२६ वर संपर्क करून सदरच्या गुन्हाबद्दल किंवा अपप्रकाराबद्दल माहिती द्यावी आपले नाव गुप्त ठेवण्यात येईल असेही आवाहन वन विभागा मार्फत करण्यात आले आहे.

### पक्ष्यांसाठी चारपाण्याची व्यवस्था

**अकोला :** दरवर्षी उन्हाळ्यात मुक्या जनावर अन पाखरांना पाण्यासाठी भटकंती करावी लागते. भूतदया दाखवित अनेकांनी उन्हाळ्यात पक्ष्यांसाठी पाण्याचे पात्र लावण्याचा उपक्रम विविध स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून सुरु केला आहे. मात्र येथील निसर्गप्रेमी शेख मुन्ना हे आपल्या खर्चातून दरवर्षी पक्ष्यांसाठी अन्न आणि पाणी दोन्ही एकाच ठिकाणी मिळतील अशा पात्राची निर्मिती करतात. मागील दहा वर्षांपासून त्यांचा हा उपक्रम सुरु असून यंदाही त्यांनी पक्ष्यांसाठी पात्र बनविणे सुरू केले आहे. उन्हाळ्याची दाहकता आता जाणवू लागली असून शहरातील तापमानाचा पारा दिवसेंदिवस चढताना दिसून येत आहे. अकोला जिल्हा उष्णतेसाठी विशेष प्रसिद्ध असून येथील तापमान दरवर्षी ४० ते ४५ अंशापेक्षा अधिक दिसून येते. अशात मुक्या प्राण्यांसह पक्ष्यांची पाण्यासाठी भटकंती होते. अन्न- पाण्यासाठी त्यांना भटकंती करावी लागत असल्यामुळे उन्हाळ्यात अनेक संस्था, व्यक्तींकडून पक्ष्यांसाठी पाण्याची व्यवस्था करण्यात येते.

## शहरातील थकित मालमत्ता धारकांनी शास्ती अभय योजनेचा लाभ घ्यावा : मनपा आयुक्त

**▪अकोला, दि.२७ (प्रतिनिधी):** अकोला महानगरपालिका क्षेत्रातील थकित मालमत्ता धारकांना त्यांचा थकित कराचा भरणा करणे अधिक सोईचे व्हावे याकरिता मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनील लहाने यांच्या आदेशान्वये २० जानेवारी ते ३१ मार्च २०२५ या कालावधीमध्ये (ब्याज माफी) अर्थात शास्ती अभय योजना सुरू करण्यात आली आहे. या अभय योजने अंतर्गत शास्तीच्या (व्याजच्या) रकमेत ९० टक्के सूटचे आज शेवटचे दिवस असून नागरिकांनी थकित कराची रकमेचा भरणा एकरकमी करून या संधीचा लाभ घ्यावा. १ मार्च ते १५ मार्च २०२५ या कालावधीमध्ये थकीत कराचा भरणा केल्यास शास्तीच्या रकमेमध्ये ८० टक्के सूट देण्यात येणार आहे. आणि १६ मार्च ते ३१ मार्च या कालावधीमध्ये थकीत करण्याचा भरणा केल्यास शास्तीच्या रकमेमध्ये ७५ टक्के सूट देण्यात येणार आहे. तरी शहरातील सर्व मालमत्ता धारकांनी आपला थकीत व चालू वर्षातील मालमत्ता कराचा भरणा एकरकमी करून जप्ती व लिलावा सारख्या अप्रिय कारवाई टाळून प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन अकोला महानगरपालिका प्रशासनाव्दारा करण्यात येत आहे.

## संत सेवा घडणं हे परम भाग्याचं लक्षण : ह.भ.प पुरुषोत्तम महाराज देहूकर

### ▪कालवाडी क्षेत्री संतांच्या मुर्त्यांचा प्राण प्रतिष्ठा सोहळा

**▪अकोट, दि.२७ (प्रतिनिधी):** संतजन हे आपले मायबाप आहेत. त्यांची सेवा घडणं हे भाग्याचं लक्षण आहे. कालवाडी सारख्या छोट्याशा गांवात संतकृपेने तुकोबारायांचं मंदीर उभारुन प्रति देहूचे मान मिळाला. हे या गांवांचं परम भाग्य आहे. तुकोबारायाची अशीच सेवा घडत राहो ही सेवा आपल्या इच्छा आकांक्षा पुर्ण केल्याशिवाय राहणार नाही असा आशीर्वाद जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज संस्थान देहूचे अध्यक्ष तथा तुकोबांचे वंशज ह भ प पुरुषोत्तम महाराज मोरे यांनी ग्रामस्थांना दिला

विदर्भाचे देहू म्हणून प्रख्यात असलेल्या श्री क्षेत्र कालवाडी येथील श्री संत तुकाराम महाराज मंदिरात संतांच्या संगमवरी मुर्त्यांचा प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात पुरुषोत्तम महाराज बोलत होते. या प्रसंगी श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प. वासुदेवराव महल्ले, उपाध्यक्ष बाबाराव बिहाडे, ज्येष्ठ सहकार



नेते रमेश हिंगणकर, विश्वस्त अवि गावंडे ह भ प विष्णु महाराज गावंडे आदी उपस्थित होते

याप्रसंगी संस्थेच्या वतीने 'धन्य आम्ही तुका देखीयेला' या भक्तीभावाने संतजन अथितींचे स्वागत ह.भ.प.अनंत महाराज यांनी केले. संत वासुदेव महाराजांचे प्रेरणेने व वै पंजाबराव हिंगणकर यांचे पुढाकाराने उभारलेल्या या मंदिराचा नुकताच जिणीद्धार करण्यात आला असून श्री संत ज्ञानेश्वर महाराज, श्री संत गजानन महाराज, श्री संत भास्कर महाराज, व श्री संत वासुदेव महाराज, बैरागी बुवांच्या पादुकाचा पुन; प्राणप्रतिष्ठा तथा शिवलिंग व नंदीकेश्वरांची नव्याने प्राणप्रतिष्ठा पुरुषोत्तम महाराज मोरे यांच्या हस्ते पार पडली. दरम्यान विधिवत पूजा अर्च्यी होम हवन पार पडले. पुजेचे पौरोहित्य अनिल महाराज राजवैद्य यांनी केले. प्रा.गजानन हिंगणकर, सुधाकरराव हिंगणकर, प्रदिप हिंगणकर यांचे हस्ते संतांची विधीवत पुजा पार पडली. होमहवन व आरतीत यजमान म्हणून रामु धांडे, ज्ञानेश्वर हिंगणकर, दत्तात्रय हिंगणकर, जय मोहोड, संदीप हिंगणकर, शुभम मोहोड,, गोपाल हिंगणकर प्रविण जकाते, विजय हिंगणकर, अमोल हिंगणकर, प्रफ्फुल्ल हिंगणकर यांनी सहभाग घेतला. दुस-या दिवशी महाप्रसादाने या भक्ती सोहळ्याची सांगता झाली. या भक्ती सोहळ्यात गांवकरी सहभागी झाले होते.

## अल्पसंख्याक उमेदवारांना प्रशिक्षणासाठी इच्छूक संस्थांनी अर्ज करावेत

### नियोजन कार्यालयाचे आवाहन

**▪अकोला, दि.२७ (प्रतिनिधी):** अल्पसंख्याक समुदायातील उमेदवारांना समान संधी, शासकीय सेवेत, तसेच पोलीस दलात निवड होण्याच्या अनुषंगाने प्रशिक्षण देण्यात येणार आहे. उमेदवारांना निवासी पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण योजनेत प्रशिक्षण देऊ इच्छिणा-या संस्थांनी जिल्हा नियोजन अधिका-यांकडे तत्काळ अर्ज करावेत.

असे आवाहन करण्यात आले आहे. किमान २५ ते कमाल ५० प्रशिक्षणार्थींना निवासी पोलीस शिपाई भरतीपूर्व परीक्षेसाठी प्रशिक्षण देण्याची सुविधा संस्थेकडे असावी. विद्यार्थ्यांकडून गणित, सामान्यज्ञान, बुद्धिमत्ता चाचणी, मराठी भाषा यासह शारिरीक चाचणीसाठी सराव करून घेणे अपेक्षित आहे. त्यासाठी अनुभवी प्रशिक्षक असावेत. ग्रंथालय, वाचनालय, स्वच्छतागृहे, ५० प्रशिक्षणार्थींसाठी निवास खोल्या, मैदान, महिला उमेदवारांसाठी स्वतंत्र- सुरक्षित व्यवस्था आदी बाबी असणे आवश्यक आहे. ५० प्रशिक्षणार्थींसाठी निवास, अभ्यास साहित्य, प्रशिक्षण, अल्पोपहार, भोजन आदींसाठी १२ लक्ष २ हजार ५०० रू अनुदान अनुज्ञेय आहे. त्यानंतर २५ टक्के अनुदान दोन महिने प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर व उर्वरित २५ टक्के अनुदान प्रशिक्षित उमेदवार प्रत्यक्षात पोलीस भरतीच्या चाचणीस उपस्थित असल्याचा पुरावा सादर केल्यानंतर जिल्हाधिका-यांमार्फत प्रशिक्षण संस्थांना अदा करण्यात येतील.

## शिवर येथील शिवमंदिरात पाच हजार दिव्यांची आरास

**▪अकोला, दि.२७ (प्रतिनिधी):** श्री शिव चॅरिटेबल ट्रस्ट शिवर व्दारा संचालीत जागृत श्री शिव मंदिरात महाशिवरात्रीचे औचित्य साधून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी सकाळी पंडित रतनजी तिवारी यांच्या हस्ते मंदीरातील पिंडीचा सामुहिक अभिषकाचा व महादेवाच्या पिंडीचा नामकरण सोहळा पार पडला. याप्रसंगी मंदीरातील महादेवाच्या पिंडीला त्यांच्या हस्ते श्री महाकालेश्वर शिवालय नाव देण्यात आले. याप्रसंगी श्री महाकालेश्वराच्या जयघोषाने यावेळी परीसर दुमदुमला होता. यानंतर सामुहिक आरती तसेच विविध पुजनाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी भाविक भक्तांना फराळाचे वितरण करण्यात आले. यानंतर मुक्ताई महीला हरीपाठ भजनी मंडळाच्या महीलांनी बहारदार भक्तीगितांचे सादरीकरण करुन मंत्रमुग्ध करुन टाकले. संध्याकाळी गावातील भाविकांनी स्वयंस्फूर्तीने मंदीरात पाच हजारांहून अधिक दिवे लाऊन दिपोत्सवाचा कार्यक्रम पार पाडला. यावेळी दिव्यांनी मंदीराचा परीसर उजळून निघाला होता.

## आर्ट ऑफ लिविंग अकोलाच्या रजत वर्षानिमित्त रविवारी भव्य भजन संध्या

### आंतरराष्ट्रीय भजनकार विक्रम हाजरा गाणार भजने

**▪अकोला, दि.२७ (प्रतिनिधी):** लाखो भक्तांचे तारणहार श्री श्री रविशंकर यांच्या आर्ट ऑफ लिविंग परिवार अकोलाच्या वतीने रविवार दिनांक २ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता गांधी रोड वरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर खुले नाट्यगृह येथे भव्य भजन संध्याचे आयोजन करण्यात आले आहे. या भजन संध्येत आर्ट ऑफ लिविंग चे आंतरराष्ट्रीय भजनकार व पॉप गायक विक्रम हाजरा हे भजन संध्या सादर करणार आहेत. आर्ट



ऑफ लिविंग अकोला शाखेच्या रजत जयंती निमित्त हा उपक्रम साकार करण्यात आला आहे. जागतिक ग्लोबल वार्मिंग वर विशेष वैश्विक उपक्रम राबविणारे श्री श्री रविशंकर यांच्या मार्गदर्शनात जगभरात आर्ट ऑफ लिविंगचे विविध लोकोपयोगी व कल्याणकारी उपक्रम सुरू असून अकोला जिल्ह्यातही जलयुक्त शिवार, नदीचा गाळ काढणे व उन्हाळ्याच्या दिवसात पाण्याचे दुर्भिक्ष असणाऱ्या गावांना आरो पाणी वितरित करणे आदी उपक्रम आर्ट ऑफ लिविंग अकोला परिवाराच्या वतीने सातत्याने करण्यात येत आहेत. सुंदर अकोला हरित अकोला हे ब्रीद घेऊन आर्ट ऑफ लिविंगचा स्थानिक परिवार अनेक कल्याणकारी उपक्रम त्याचबरोबर अनेक शिबिरे, सुदर्शन क्रिया, श्रमदान, स्वच्छता अभियान आदी उपक्रम राबवित आहे. महानगरात आयोजित भजन संध्येतील विक्रम हाजरा हे आर्ट ऑफ लिव्हिंगच्या आंतरराष्ट्रीय परिवारातील ख्यातनाम गायक, भजनकार व संगीत निर्माते म्हणून प्रसिद्ध असून आहेत. आर्ट ऑफ लिविंग च्या माध्यमातून आतापर्यंत त्यांनी ५० राष्ट्रात लंडन ते जोहान्सबर्ग पर्यंत आपल्या आधुनिक दर्जाच्या संगीताने युक्त जागतिक संगीत शैलीच्या माध्यमातून आगळावेगळा भजन संध्येचा कार्यक्रम सादर केला आहे. त्यांच्या आधुनिक पॉप संगीत संध्या या गाजल्या असून पंडित चौरसिया व श्री श्री रविशंकर यांच्या समवेतही त्यांनी आपले दर्जेदार भजन कार्यक्रम सादर केले आहेत. आर्ट ऑफ लिविंग च्या वतीने आयोजित या भजन संध्येचा महिला पुरुष साधकांनी लाभ घ्यावा असे अवाहन आर्ट ऑफ लिविंगचे डीटीसी सदस्य, शिक्षकगण व स्वयंसेवकांच्या वतीने करण्यात आले.

## आरटीई प्रवेशासाठी आज अतिम मुदत

### ▪२६ तारखेपर्यंत ७१३ पाल्यांचे प्रवेश निश्चित

**▪अकोला, दि.२७ (प्रतिनिधी):** मोफत शिक्षण हक्क अधिनियम अकोला २००९ अन्वये जिल्ह्यातील १९१ खासगी विनाअनुदानित शाळांमध्ये गरीब व गरजू समाजातील मुलांना २५ टक्के जागांवर प्रवेश देण्याची तरतूद करण्यात आली आहे. याअंतर्गत जिल्ह्यातील १९१ शाळांमध्ये राखीव असलेल्या १९९२ जागांसाठी ६०३६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १९६८ विद्यार्थ्यांची आरटीई अंतर्गत निवड झाली असून निवड झालेल्या विद्यार्थ्यांची कागदपत्रे तपासून प्रवेश निश्चित करण्याची प्रक्रिया २८ फेब्रुवारीपर्यंत आहे. आतापर्यंत जिल्ह्यातील ७१३ पाल्याचे प्रवेश निश्चित झाले असून १२५५ मुलांचे प्रवेश बाकी आहेत. बालकांचा मोफत शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ नुसार, अल्पसंख्याक




शाळा वगळता मान्यताप्राप्त खासगी प्राथमिक शाळांमध्ये वंचित, दुर्बल आणि गरजू विद्यार्थ्यांसाठी इयत्ता पहिली किंवा पूर्व प्राथमिक वर्गात २५ टक्के आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे.

मागील शैक्षणिक सत्र २०२४- २५ साठी शिक्षण हक्क अंतर्गत प्रवेश प्रक्रियेस चुकीच्यानिर्णयामुळे, नंतर न्यायालयीन प्रकरणांमुळे आणि पुनर्विचारामुळे विलंब झाला. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले. त्यामुळेयावेळी डिसेंबर २०२४ पासून शाळांची नोंदणी सुरू झाली.

जानेवारी महिन्यापासून विद्यार्थ्यांची नोंदणी सुरू झाली. यानंतर फेब्रुवारी किंवा महिन्यात प्रवेशाची लॉटरी जाहीर करण्यात आली. त्यामुळे यंदा प्रथमच जून-जुलै महिन्यात संपूर्ण प्रवेश प्रक्रिया पूर्ण होणार आहे. परिणामी आरटीई अंतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे वर्गही नियमित वेळेत सुरूहोतील.

शुक्रवारी लॉटरी पद्धतीने निवड करण्यात आलेल्या पाल्यांना प्रवेश घेण्यासाठी अंतिम मुदत देण्यात आली आहे. बुधवार, २६ फेब्रुवारी पर्यत ७१३ पाल्यांचे प्रवेश निश्चित झाले होते.

## गावांच्या समृद्धीसाठी जलसंवर्धन आवश्यक

**अकोला :** जलसंवर्धनातूनच सिंचन व कृषी उत्पादकता वाढेल. खेडीपाडी समृद्ध होतील. त्यामुळे गावोगाव पाणलोट व्यवस्थापन व्हावे, असे आवाहन बाळापूरचे उपविभागीय अधिकारी अनिरूद्ध बक्षी यांनी केले. पाणलोट यात्रेचे पातूर तालुक्यातील पिंपरडोळी येथे सोमवारी स्वागत करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. सरपंच गंगासागर ताजने, अनिलबाबा देशमुख, नायब तहसीलदार तेलगोटे, राम ठोके, वानरे, आर. इंगळे आदी उपस्थित होते. प्रारंभी जि. प. शाळेच्या विद्यार्थ्यांच्या सहभागातून प्रभातफेरी काढण्यात आली. यानिमित्त निबंध व चित्रकला स्पर्धेतील गुणवंतांना बक्षीसवितरण झाले. रूक्मिणी स्वयंसहायता गट, वैष्णवी स्वयंसहायता गट, संघर्ष स्वयंसहायता गट यांचे स्टॉलही यात्रेनिमित्त लावण्यात पथनाट्याद्वारे जनजागृती, वृक्षारोपण करण्यात आले. पाणलोट योद्धयांचा सत्कारही यावेळी झाला.

## सोमवारी महानगरात मोफत श्रवण तपासणी शिबिराचे आयोजन

**▪अकोला, दि.२७ (प्रतिनिधी):** सामाजिक व मानवी सेवेत सक्रिय असणाऱ्या इनरव्हील क्लब ऑफ अकोला क्वीन तथा वसंत हॉस्पिटल कीर्ती नगर यांच्या संयुक्त विद्यमाने महानगरात मोफत श्रवण तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.



जागतिक श्रवण दिनावर आयोजित हे शिबिर सोमवार दिनांक ३ मार्च रोजी सकाळी १० वाजता किर्ती नगर परिसरातील जुन्या आरटीओ रस्त्यावरील वसंत हॉस्पिटल, ताम्हणे हॉस्पिटल येथे हे एक दिवसीय मोफत श्रवण तपासणी शिबिर होणार आहे. या शिबिरात कान, नाक, घसा तज्ञ डॉ. पराग डोईफोडे तथा श्रवण तज्ञ डॉ स्वप्निल गारडे हे रुग्ण तपासणी करून रुग्णांना यथोचित मार्गदर्शन करणार आहेत. या शिबिराची रुग्ण नोंदणी सुरू असून रुग्णांनी ९०८२४७२०१७ यावर संपर्क करण्याचे आवाहन इनरव्हील क्लब ऑफ अकोला कवीन्सच्या अध्यक्ष रुची रुहाटीया, सचिव सोनल सकलेचा, कोषाध्यक्ष दीपिका शाह, आयएसओ कल्याणी पवित्रकार, सीसी अंकिता सोनी समवेत वसंत हॉस्पिटल कीर्ती नगरच्या वैद्यकीय वर्गाने केले आहे.

# अस्मिता

## पाणी खरेच शुद्ध आहे?

दुषित पाण्याने होणाऱ्या आजाराची (जीबीएस)दहशत वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर शुद्ध आणि स्वच्छ पाणी मिळणे हे एक आव्हान बनत आहे. स्वच्छ पाणी मिळवण्यासाठी सध्या अनेक घरांमध्ये रिव्हर्स ऑस्मोसिस (आरओ) सिस्टीम बसवलेल्या आढळतील. मात्र आरओ बसवण्यासोबतच पाण्याच्या गुणवत्तेसाठी त्यात विरघळलेल्या घन पदार्थांची म्हणजेच टीडीएसची माहिती घेणेदेखील महत्त्वाचे असते हे लक्षात घ्या कारण यातील असंतुलनामुळे पाणी आरोग्यासाठी हानिकारक ठरु शकते. पाण्याची गुणवत्ता तपासण्यासाठी ही टीडीएस चाचणी केली जाते. तेव्हा उन्हाळा सुरू होत असल्याच्या पार्श्वभूमिवर ती अवश्य करुन घ्या.



## ऋतूबदल होतोय, स्वास्थ्य जपा

बदलत्या ऋतूंचा आपल्या शरीरावर आणि मनावर खोलवर परिणाम होतो. हिवाळ्यापासून उन्हाळ्याकडे जाताना शरीराला नवीन ऋतूशी जुळवून घेण्यासाठी योग हा एक उत्तम पर्याय आहे. योगासनांमुळे केवळ शारीरिक आरोग्यच चांगले राहत नाही तर मानसिक संतुलन सुधारते आणि उर्जेची पातळीदेखील वाढते. तेव्हा हंगामी संसर्ग टाळण्यासाठी तसेच निरोगी राहण्यासाठी रोगप्रतिकारक शक्तीचे वर्धन करण्यास साह्यभूत ठरणारी योगासने नेमाने करु या.

* सूर्य नमस्कार

सूर्यनमस्कार शरीरात उष्णता टिकवून ठेवतात आणि उर्जेची पातळी देखील वाढवतात. हे १२ आसनांचे चक्र शरीराच्या सर्व भागांना सक्रिय करते. सूर्यनमस्कार केल्याने रक्ताभिसरण सुधारते, पचनसंस्था मजबूत होते आणि शरीर लवचिक बनते. याशिवाय तणाव कमी करण्यास तसेच मन शांत करण्यास देखील ते मदत करते.

* भुजंगासन

भुजंगासन छाती आणि फुफ्फुसांना मोकळे करण्यास मदत करते. हिवाळ्यानंतर उन्हाळ्यात प्रवेश करताना ते विशेषतः फायदेशीर ठरते. हे आसन पाठीचा कणा मजबूत करते तसेच पोटाच्या अवयवांना सक्रिय करते. भुजंगासन नियमितपणे केल्याने श्वसनसंस्था मजबूत होते आणि शरीरातील ऊर्जा देखील वाढते.


* वृक्षासन

संतुलन आणि लक्ष केंद्रित करण्यासाठी वृक्षासन सर्वोत्तम आहे. हे आसन पाय आणि घोटे मजबूत करते आणि मन शांत ठेवते. हवामान बदलावेळी शरीर स्थिर ठेवण्यासाठी आणि मानसिक स्थिरता प्राप्त करण्यासाठी हे आसन खूप फायदेशीर आहे. खेरीज हे आसन शरीराचे संतुलन राखण्यासही मदत करते.


* त्रिकोणासन

त्रिकोणासन शरीराच्या सगळ्या बाजू मोकळ्या करते आणि पाठीचा कणा लवचिक बनवते. या आसनामुळे पचनसंस्था सुधारते तसेच शरीरातील विषारी घटक बाहेर काढण्यास मदत होते. याशिवाय हे आसन पाय, कंबर आणि खांदे मजबूत करते. नियमितपणे हे आसन केल्यास रक्ताभिसरण सुधारते.







## पारुल चावला यांचा पदरव

अलिकडेच पीआर आणि मार्केटिंग उद्योगातील सर्वात प्रसिद्ध नावांपैकी एक असणाऱ्या पारुल चावला यांना 'मिफ'मध्ये मीडिया समुदायाने सन्मानित केले. हा एक महत्त्वपूर्ण क्षण आपण अनुभवला. कथांना आकार देण्यात तसेच विविध ब्रँड्सचे नाव उंचावण्यात दिलेल्या अतुलनीय योगदानाबद्दल पारुल यांना या सन्मानाने गौरविण्यात आले. बॉलीवूड स्टार विकी कौशल आणि शिल्पा शेट्टी यांनी त्यांचा सन्मान केला. आज आपण पारुल चावला या मानिनीच्या कामाची माहिती घेऊ या.

पारुल चावला यांनी अग्रगण्य धोरणांनी आणि अतुलनीय कौशल्याने माध्यम जगात क्रांती घडवून आणली आहे. त्यांची कंपनी 'पिक्चर एन क्राफ्ट' ने असंख्य चित्रपट, संगीत लेबल्स आणि व्हिडिओ, चित्रपट कलाकार, कॉर्पोरेट्स, फॅशन हाऊसेस आणि डिझायनर्स, स्पर्धा, कार्यक्रम, टेलिव्हिजन शो, राजकीय व्यक्तिमत्त्वे, रिअल इस्टेट प्रकल्प तसेच इतर संस्था आणि वैयक्तिक प्रतिभांसाठी डिजिटल मोहिमांना यशस्वीरित्या प्रोत्साहन दिले असून त्यासाठी सुयोग्य नीती आखण्याचे काम केले आहे. थोडक्यात या सगळ्यांना नवी ओळख मिळवून देण्यात त्यांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. अनेक पुरस्कारांवर आपले नाव कोरलेल्या पारुल चावलाच्या प्रभावी पुरस्कारांच्या यादीत सरस्वतीबाई दादासाहेब फाळके नारी शक्ती सन्मान पुरस्कार, सर्वोत्तम जनसंपर्क, सर्वोत्कृष्ट जनसंपर्क आणि विपणन फर्म, वॉव मीडिया, इव्हेंट्स अँड पब्लिक रिलेशन्स पर्सन ऑफ द इयर, बिझनेस एक्सलन्स अवॉर्ड, बेस्ट मीडिया प्रोफेशनल आदी आणि इतरही अनेक पुरस्कारांचा समावेश आहे.

पारुल यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली 'पिक्चर एन क्राफ्ट'ने भारतातील सर्वात प्रतिष्ठित स्वदेशी वैविध्यपूर्ण संप्रेषण गटांपैकी एक वेगळी प्रतिष्ठा मिळवली आहे. कंपनीचे ध्येय म्हणजे ग्राहकांच्या अंतर्दृष्टी, अनुभव, कौशल्य, सर्जनशीलता, पर्यावरणीय ज्ञान आणि व्यावसायिक कौशल्याचा वापर करून, नफ्यात शाश्वत वाढ करून सर्वोत्तम संप्रेषण एजन्सी बनणे हे आहे. पारुल चावला यांची उत्कृष्टतेसाठीची वचनबद्धता आणि नवोन्मेषासाठी सतत प्रयत्नशील राहिल्याच्या ध्येयाने उद्योगात नवीन मानके निर्माण झाली आहेत. 'पिक्चर एन क्राफ्ट' ची सगळी टीम त्यांच्या नेतृत्वाखाली काम करते. ती मीडिया आणि पीआरच्या भविष्याला आकार देणारी नवीन क्रांतिकारी साधने, प्रक्रिया आणि प्रणाली विकसित करत असते. पारुल चावला म्हणतात, 'आम्ही जनसंपर्क आणि मार्केटिंग क्षेत्रात नवोन्मेष आणण्याचा आणि सीमा ओलांडण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळेच अलिकडे मिळालेला पुरस्कार आम्हाला क्लायंटसाठी उत्कृष्टता प्रदान करत राहण्यास प्रेरित करणारा आहे.' थोडक्यात चित्रपट, संगीत, डिजिटल मीडिया, सोशल मीडिया, जाहिरात आणि मार्केटिंगमध्ये 'पिक्चर एन क्राफ्ट' ही कंपनी आघाडीची शक्ती म्हणून उभे आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. हा संपूर्ण उद्योग पारुल यांच्या दूरदर्शी नेतृत्वाच्या बळकट खांबावर असाच वाढणार आहे.




## तेजस्वी त्वचेसाठी...

सूर्यप्रकाश, प्रदूषण आणि ताणतणाव यामुळे चेहरा निस्तेज दिसू लागतो. उन्हाळ्यात तर हा त्रास तीव्रतेने जाणवतो. पण आपल्याला नेहमी पार्लरमध्ये जाऊन फेशियल करण्यासाठी वेळ मिळत नाही, तसेच प्रत्येक वेळी केमिकलयुक्त उत्पादने वापरणेही योग्य नसते. अशावेळी घरी नैसर्गिक घटकांपासून बनवलेला फेस पॅक लावून आपण त्वचेला त्वरित चमक देऊ शकतो. यातील रसायनमुक्त, प्रभावी आणि पूर्णपणे नैसर्गिक तत्वे त्वचेची खोलवर स्वच्छता करतात आणि ती निरोगी आणि चमकदार बनवतात.

* काकडी आणि कोरफडीचा फेस पॅक: तुमची त्वचा कोरडी आणि निर्जीव झाली असेल तर हा पॅक वापरल्याने तिला त्वरित हायड्रेशन मिळेल. त्यासाठी दोन चमचे काकडीचा रस, एक टीस्पून कोरफड जेल आणि एक चमचा मध ही सामग्री घ्या. सर्व घटक चांगले मिसळून चेहऱ्यावर लावा. १५-२० मिनिटांनी थंड पाण्याने धुवा. हा नैसर्गिक पॅक त्वचेला थंडावा देतो. याने त्वचेचा कोरडेपणा दूर होतो तसेच तो त्वचेला खोलवर मॉइश्चरायझही करतो.

* पुदिना आणि मुलतानी मातीचा फेस पॅक: तुमची त्वचा खूप तेलकट झाली असेल तसेच मुरुमे दिसू लागली असतील तर हा फेस पॅक त्यावर नियंत्रण ठेवेल. यासाठी एक टीस्पून पुदिन्याची पेस्ट, एक टीस्पून मुलतानी माती आणि एक चमचा गुलाबजल घ्या. हे सर्व पदार्थ एकत्र मिसळून चेहऱ्यावर लावा. १५ मिनिटांनी कोमट पाण्याने चेहरा धुवा. हा पॅक त्वचेवरील अतिरिक्त तेल काढून टाकतो तसेच नियमित लावल्यास मुरुमे आणि डागही कमी होतात.

* ग्रीन टी आणि दह्याचा फेस पॅक: त्वचा निस्तेज आणि निर्जीव दिसत असेल तर हा फेस पॅक तुम्हाला त्वरित चमक देईल. त्यासाठी एक टीस्पून ग्रीन टी, एक टीस्पून दही आणि एक टीस्पून मध घेऊन एकत्र मिसळा आणि चेहऱ्यावर लावा. २० मिनिटांनंतर हलक्या हाताने मसाज करा आणि चेहरा धुवा. नियमित वापर केल्यास या लेपामुळे त्वचा घातक द्रव्यांपासून मुक्त होते तसेच सुरकुत्याही कमी होतात.



## मेकअप करताना...

बरेचदा मेकअप केल्यानंतर चेहरा डार्क दिसतो. काळपट छटा डोकावते. यामागे आपल्या काही चुका कारणीभूत असतात. जसे की, मेकअप करताना चेहऱ्याचा रंग आणि मेकअप उत्पादनांमध्ये योग्य टोन न निवडल्यास ही समस्या संभवते. कधीकधी चुकीचे फाउंडेशन किंवा कन्सीलर वापरल्यानेही चेहरा काळवंडू शकतो. म्हणूनच नेहमी त्वचेच्या रंगानुसार उत्पादने निवडा आणि ती योग्यरित्या मिसळून नंतरच त्वचेवर लावा. चेहऱ्यावर काळे डाग असतील तर नारंगी किंवा पीच रंगाच्या कन्सीलरचा वापर करा. यामुळे तुमची त्वचा निर्दोष दिसण्यास मदत करेल.



## अतिरेक नको

अनेक कारणांसाठी ॲलोवेरा जेलचा वापर होताना दिसतो. त्याचे बरेच फायदे मिळतात. मात्र अतिरिक्त प्रमाणात कोरफडीच्या जेलचा वापर त्वचेसाठी हानिकारक देखील ठरु शकतो. जास्त वापर केला तर त्वचेसंबंधी अनेक समस्या निर्माण होऊ शकतात. उदाहरणार्थ, एलोवेरा जेल जास्त प्रमाणात वापरत असाल तर त्वचेवर खाज आणि जळजळ होऊ शकते. तसेच काहींना ॲलर्जीचा त्रासही संभवतो. अर्थातच यामुळे त्यांना अधिक समस्यांना तोंड द्यावे लागू शकते. म्हणूनच कोरफडीचा गर वा जेल प्रमाणात वापरा.





## आकर्षक लूकसाठी...

तुम्हाला नैसर्गिक आणि ताजा ब्लश लूक हवा असेल तर लिपस्टिक वापरा. गालावर गडद गुलाबी किंवा न्यूड शेडची लिपस्टिक लावा आणि बोटांनी किंवा मेकअप स्पंजने चांगली मिसळा. हा लूक तुम्हाला चमकदार आणि तरुण लूक देईल.

तुम्ही लिपस्टिक आयशॅडो म्हणूनही वापरता येते. त्यासाठी आवडता लिपस्टिक रंग घ्या आणि डोळ्यांच्या वरच्या भागावर लावा. नंतर तो बोटांनी चांगला पसरवा. यामुळे डोळ्यांना नवीन आणि ग्लॅमरस लूक मिळेल.

## तुम्ही कार्यक्षम आहात?

कामाच्या ठिकाणी आपली उत्पादकता वाढणं गरजेचं असतं. उत्पादकता वाढवणं, कार्यक्षम असणं याबाबत आपले काही गैरसमज असतात. ऑफिसमध्ये जास्त वेळ बसलो, कामाचा खूप ताण घेतला की उत्पादकता वाढते असं अनेकांना वाटतं. भरपूर काम केल्याचं समाधान चेहऱ्यावर दिसू लागतं. पण यामुळे तुमची उत्पादकता खरंच वाढते का, आपण अधिक कार्यक्षम होतो का, जाणून घेऊ.

* दोन तासांच्या कामासाठी आठ तास घालवल्यामुळे तुम्ही खूप व्यस्त असल्याचं दिसत असलं तरी प्रत्यक्षात तुम्ही कार्यक्षम नसता. दोन तासांच्या कामासाठी आठ तास घालवण्यात काहीच अर्थ नसतो. अपुरी झोप आणि कामाच्या ज्यादा तासांमुळे तुमच्या आरोग्यावर परिणाम होतो. पण तुम्ही कार्यक्षम बनू शकत नाही.

* कमीत कमी वेळात शक्य तेवढं काम उरकल्याने तुम्ही कार्यक्षम ठरत नाही. ऑफिसमध्ये तुम्ही कामाचे प्राधान्यक्रम ठरवायला हवेत. महत्त्वाची कामं आधी करायला हवीत. नको ती कामं करून वेळ घालवत बसण्याला काहीच अर्थ नसतो. एका वेळी एक काम करण्यावर भर द्या.

* कार्यक्षमता वाढवण्यासाठी कर्मचाऱ्यांसोबत मिटिंग घेणं किंवा चर्चा झडणं महत्त्वाचं असतं असं अनेकांना वाटतं. पण यामुळे कामाचा ताण वाढू शकतो. कर्मचाऱ्यांसोबतची झटपट मिटिंग कार्यक्षमता वाढवू शकते. पण या मिटिंग्जचा कालावधी वाढणं कामाच्या दृष्टीने योग्य नसतं.

* ठरलेल्या वेळेत दर्जेदार काम करणं हे कार्यक्षम असण्याचं लक्षण असतं. पण एखादं काम बराच वेळ करत रहाण्याला काहीच अर्थ नसतो. कामाला जास्त वेळ लागणं हे कार्यक्षमतेचं लक्षण ठरू शकत नाही.

* आपलं काम ठरलेल्या वेळेत पूर्ण करणं किंवा कमी कालावधीत जास्तीत जास्त काम करणं म्हणजे कार्यक्षम असणं नव्हे. तर आपलं काम झाल्यानंतर आनंदी असणं, कुटुंब, आप्त, मित्रमैत्रिणींसोबत वेळ घालवायला मिळणं, छंद जोपासणं हे कार्यक्षमतेचं खरं लक्षण आहे.

# आयुक्तांना पुण्यात फक्त हप्ते वसुलीसाठी पाठवले का?

## वडेट्टीवारांचा सवाल



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ : पुण्यात एसटी स्थानकात झालेल्या बलात्काराची जबाबदारी राज्य सरकारची आहे. महाविकास आघाडी सरकारने शक्ती कायदा आणला होता, पण या कायद्याची अंमलबजावणी होत नाही. बलात्कार होऊन देखील अजूनही आरोपी पकडला जात नाही, यामुळे राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेचे धिंदवडे निघाले आहेत, अशी टीका काँग्रेस नेते, आमदार विजय वडेट्टीवार यांनी टीका केली आहे.

वडेट्टीवार पुढे बोलताना म्हणाले की, पुण्याचे पोलिस कमिशनर आधी नागपूरमध्ये होते. पुण्यात गेल्यावर गुन्हेगारांची परेड केली, पुढे काय झाले? आता पुण्यात जाऊन हफ्ते वसूली करण्यात व्यस्त आहेत का? पोलिसांचा धाक उरलेला नाही, त्यामुळे महिला अत्याचाराच्या घटना वाढ.

गुन्हा घडून गेल्यावर सरकार जागे होते. राज्यात कोलमडलेली कायदा आणि सुव्यवस्था याबाबत येणाऱ्या अधिवेशनात आम्ही प्रश्न उपस्थित करू. एसटी स्थानकात अत्याचार झाल्यावर परिवहन मंत्री आता बैठक बोलवत आहे, याचा उपयोग नाही, असे सांगत ते पुढे म्हणाले की, राज्यात एकीकडे छत्रपती शिवाजी महाराजांची बदनामी करणाऱ्यांना सुरक्षा दिली जाते. राहुल सोलापूरकर असेल किंवा कोरहटकर असेल यांच्यावर कारवाई होत नाही. उलट ते आरएसएस संबंधित असल्याने त्यांना अभय दिले जाते.भाजप यांच्या विरोधात निषेध करत नाही, आता तोंड का शिवली गेली,असा सवाल विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, आतापर्यंतचा रेकॉर्ड पहिला सत्तेमधील असलेल्या लोकांशी संबंधित असलेल्याच लोक महिलांवर अत्याचार करताना दिसत आहेत. बदलापूर घटनेमध्ये अजूनही ही संस्था चालकावर कारवाई झाली नाही.

आरोपीला एनकाउंटरमध्ये मारून त्याला अभय देण्याचे काम राज्यामध्ये सुरू आहे. त्यामुळे त्याही आरोपीला जर उद्या अभय मिळाले तर वावगे ठरणार नाही. शैक्षणिक नगरीमध्ये मुली सुरक्षित नाही, तर तिथले पोलिस कमिशनर काय करत आहे? ते हप्ते वसुलीसाठी आहे का?

# कोरटकरच्या घरावर कोल्हापूर पोलिसांचा छापा



■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २६ : छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याविषयी आक्षेपार्ह बोलून इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांना अश्लिल शिवीगाळ करणाऱ्या तथाकथित पत्रकार प्रशांत कोरटकर याच्या घरावर कोल्हापूर पोलिसांनी छापा घातला. मात्र, कोरटकर हा घरी मिळून आला नाही, त्याने दोन दिवसांपूर्वीच नागपुरातून पलायन केल्याची माहिती आहे.

इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांनी नुकतेच छावा चित्रपटावर आपली भूमिका मांडली होती. ही भूमिका मांडत असताना त्यांनी ब्राह्मण समाजाचा द्वेष केल्याचा आरोप करीत तथाकथित पत्रकार प्रशांत कोरटकर याने फोन करून थेट धमकी दिली, असा दावा सावंत यांनी केला आहे.

याबाबत सावंत यांनी एक कॉल रेकॉर्डिंग फेसबुकवर शेअर केली आहे. ज्यामध्ये जिथं असाल तिथे येऊन ब्राह्मणांची ताकद दाखवू, तुम्ही कितीही मराठे एकत्र करा, असे म्हणत या कोरटकर यांनी सावंतांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ आणि घरात येऊन मारण्याची दिली धमकी दिली आहे. तसेच कोरटकर याने राष्ट्रमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराज यांच्याबद्दल वादग्रस्त वक्तव्य केले असे या ध्वनिफीत मधून दिसून येते.

या प्रकरणी कोल्हापुरातील जुना राजवाडा पोलीस ठाण्यात प्रशांत कोरटकरविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक संतोष गळवे यांच्या नेतृत्वातील पथक बुधवारी मध्यरात्री नागपुरात पोहचले. या पथकाने बेलतरोडी पोलीस ठाण्यात आमद देऊन बेलतरोडी पोलिसांना मदत मागितली.

आज गुरुवारी सकाळी १०.३० वाजता कोल्हापूर पोलिसांच्या पथकाने बेलतरोडी पोलिसांच्या मदतीने कोरटकरच्या घरी छापा घातला. मात्र, कोरटकर हा मिळून आला नाही. त्यामुळे कोल्हापूर पोलिसांचे पथक रिकाम्या हाताने पुन्हा बेलतरोडी पोलीस ठाण्यात ठाण मांडून बसले आहे.

कोल्हापूर पोलिसांच्या पथकाच्या मदतीसाठी दोन पथके तयार करण्यात आली आहेत. एक पथक त्यांच्यासोबत देण्यात आले आहे तर दुसरे पथक कोरटकरचा शोध घेत आहेत. कोल्हापूर पोलिसांनी पूर्णपणे मदत करण्यात येत असल्याचे बेलतरोडी पोलीस स्टेशनचे ठाणेदार मुकुंद कवाडे यांनी सांगितले.

दुसरीकडे, नागपूर सायबर पोलिसांना कोरटकरचा सीडीआर आणि लोकेशनबाबत मदत मागितली आहे. कोरटकरचा सुगावा लागताच अटक करून कोल्हापूरला नेण्यात येईल, असे कोल्हापूर येथून आलेल्या पथकातील पोलीस उपनिरीक्षक संतोष गळवे यांनी सांगितले.

### मध्यप्रदेशात पलायन केल्याचा संशय?

तथाकथित पत्रकार प्रशांत कोरटकर याने अटक होण्याच्या भीतीपोटी मध्यप्रदेशात पलायन केल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली. त्यामुळे नागपूर पोलिसांचे पथक गुरुवारी सकाळीच मध्यप्रदेशाकडे रवाना झाले आहे.

गुन्हा दाखल झाल्यामुळे कोरटकरला अटक करण्यासाठी कोल्हापूर पोलिसांनी नागपूर गाठले. त्यामुळे अटकेची टांगती तलवार असल्यामुळे कोरटकर दोन दिवसांपूर्वीच कारने मध्यप्रदेशात पळून गेला. कोरटकर हा इंदूर आणि बालाघाट शहरातील एका मित्राच्या घरी लपून बसल्याची माहिती सूत्रांनी दिली. त्यामुळे बेलतरोडी पोलिसांचे एक पथक मध्यप्रदेशात सकाळीच रवाना झाले. दुसरीकडे नागपूर पोलिसांनी गेल्या तीन दिवसांपासून कोरटकरच्या घराला सुरक्षा पुरविली आहे. त्यामुळे कोरटकर पोलिसांच्या हातावर तुरी देऊन मध्यप्रदेशात पळाल्याची चर्चा होत आहे. कोरटकर याला राज्यातील दोन मोठ्या राजकीय नेत्यांचा वरदहस्त आहे. त्याचा गृहमंत्रालयात वचक आहे. तसेच पोलीस विभागातील आयपीएस अधिकाऱ्यांसोबत शेकडो फोटो त्याने फेसबुकवर टाकले आहेत. त्याची पोलीस विभागातील अनेक अधिकाऱ्यांसोबत मैत्री असल्याचे बोलले जाते.

## पर्यटक, भाविकांच्या सुरक्षिततेसाठी

# पर्यटक पोलीस ठाणे

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ : लोणावळ्यातील पर्यटकांची आणि कार्ला येथील भाविकांची वाढती संख्या लक्षात घेऊन दोन्ही ठिकाणी सुरक्षेच्यादृष्टीने पर्यटन पोलिस ठाणी स्थापन करण्यात येतील. महामार्गांवरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी तळेगाव, चाकण, शिक्रापूर परिसरातल्या महामार्गाचे रुंदीकरण, महामार्गावर उड्डाणपूल उभारण्यासाठी मुख्यमंत्री महोदयांच्या माध्यमातून केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालयाकडे पाठपुरावा करण्यात येईल, यासाठी मी स्वतः पुढाकार घेईन, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज बैठकीत स्पष्ट केले.

पुणे जिल्ह्याच्या मावळ तालुक्यातील विकास प्रकल्पांच्या अंमलबजावणीतील अडचणी दूर करुन या प्रकल्पांना गती देण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी, कार्ला येथील आई एकविरा देवीच्या दर्शनासाठी दरवर्षी लाखो भाविक येतात. मंदिर परिसरात भाविकांना चांगल्या सोयीसुविधा देण्यासाठी मंदिर परिसराच्या विकासाची कामे करण्यात येत आहेत. वेहेरगाव येथील श्री एकवीरा देवी मंदिर येथे फनिक्युलर रोपवे उभारण्यासंदभार्तील कामांना मान्यता मिळाली आहे. या प्रकल्पामुळे भाविकांना अल्पावधीत मंदिरात पोहोचता येणार आहे. प्रकल्पाची गतीने उभारणी करावी, अशा सूचना दिल्या.

# भाजपच्या काळात मतदारही असुरक्षित

## नाना पटोले यांचा आरोप



■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २७ : भाजप सरकारच्या काळात मतदारांचे मतदानही सुरक्षित राहिलेले नाही. निवडणूक आयोगाने मतदार याद्यात मोठा घोटाळा केला आहे.

निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानसभेसाठी जाहिर केलेली मतदार संख्या ९.७० कोटी आहे तर मोदी सरकारच्या आरोग्य विभागाने महाराष्ट्रातील प्रौढ मतदारांची संख्या ९.५४ कोटी असल्याचे जाहीर केले आहे, निवडणूक आयोगाने ही वाढीव संख्या कोठून आणली? मतदानादिवशी संध्याकाळी जाहीर केलेली ५८ टक्के मतदान दुसऱ्या दिवशी ६६.५ टक्के कसे वाढले? लाडकी बहिण योजनेचा लाभ बांगलादेशींनी घेतल्याचे सरकार सांगत आहे, तसे विधानसभेला वाढलेले हे मतदार केंद्रातील भाजप सरकारने बांगलादेशातून आणले का? असा प्रश्न काँग्रेस कमिटीचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी विचारला.

लोकशाहीचे रक्षण व मतदारांची जागृती करण्यासाठी काँग्रेस पक्षाने राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून राज्यभर आंदोलन करून पत्रकार परिषदा घेतल्या. नागपूर येथे पत्रकार परिषदेला संबोधित करताना प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, मतमोजणी वेळी एक-दोन मतदार वाढले तरी निवडणूक रद्द होते, पण विधानसभेला ६० लाख मतदार वाढले पण त्यावर निवडणूक आयोग काहीच उत्तर देत नाही. रात्रीच्या अंधारात ७६ लाख मते कशी वाढली, याचे उत्तर निवडणूक आयोगाने अजून दिलेले नाही. पण हिवाळी अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवडणूक आयोगाची वकिली करत त्यावर स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला. देवेंद्र फडणवीसांना ती स्क्रिप्ट नरेंद्र मोदी, अमित शाह, की निवडणूक आयोगाने दिली होती, असा सवाल नाना पटोले यांनी केला.

लोकसभा निवडणूक २०१९ ते २०२४ या पाच वर्षात राज्यात ५० लाख मते वाढली, तर लोकसभा निवडणूक २०२४ व विधानसभा निवडणूक २०२४ या सहा महिन्यात ४६ लाख मते वाढली, एवढ्या मोठ्या प्रमाणावर मतदार वाढले कसे, याचे उत्तर निवडणूक आयोग देत नाही, आता तर निवडणूक आयोगाने त्यांच्या वेबसाइटवरून सर्व डेटाच डिलीट केला आहे.

भाजप निवडणूक आयोगाच्या मदतीने दिवसाढवळ्या लोकशाहीचा गळा घोटत आहे. काँग्रेस पक्ष लोकशाहीच्या रक्षण व निवडणूक आयोगाच्या घोटाळ्याविरोधात रस्त्यावर व न्यायालयीन लढा देत आहे, असे नाना पटोले म्हणाले.

# एकाचवेळी तिघींवर काळाची झडप



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २६ : महाशिवरात्रीच्या दिवशी वैनगंगा नदी पात्रात आंघोळीसाठी गेलेल्या चंद्रपूर (बाबुपेठ) येथील प्रकाश मंडल यांच्या कुटुंबातील तीन मुलींना जलसमाधी मिळाली.

यात प्रतिमा (२३), कविता (२२) आणि लिपिका (१८) यांचा समावेश असून, तिघीही सख्ख्या बहिणी होत्या. प्रकाश मंडल, त्यांचे कुटुंबीय आणि राहा कुटुंबीय आंघोळीसाठी वैनगंगा नदी पात्रात उतरले. पाण्याचा अंदाज न आल्याने प्रतिमा, कविता आणि लिपीका यांचा बुडून मृत्यू झाला. प्रकाश मंडल यांना पत्नी व मुलाला वाचविण्यात यश आले परंतु ते मुलींना वाचवु शकले नाही. सतत एकमेकींसोबत राहणाऱ्या, तिन बहिणींच्या अशा अकाली मृत्यूने चंद्रपूरसह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# काँग्रेसचे माजी आमदार सुभाष चव्हाण यांचे निधन

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ : काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि माजी आमदार सुभाष चव्हाण यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. मागील काही दिवसांपासून त्यांची प्रकृती खालावली होती आणि त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. आज त्यांनी शेवटचा श्वास घेतला.

सुभाष चव्हाण यांचा जन्म सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण तालुक्यातील धामापूर येथे झाला. या गावाला पर्यटन स्थळ म्हणून विकसित करण्यासाठी त्यांचे मोठे योगदान राहिले आहे. दरम्यान, त्यांच्या निधनावर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी शोकसंवेदना व्यक्त केल्या आहेत. त्यांच्या निधनाने काँग्रेस पक्षाने एक निष्ठावान आणि समर्पित कार्यकर्ता गमावला आहे, अशी भावना महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष यांनी व्यक्त केली आहे.

सुभाष चव्हाण यांनी अखेरच्या श्वासापर्यंत काँग्रेस विचारधारा सोडली नाही. त्यांनी पक्षाच्या वाढीसाठी दिलेले योगदान अमूल्य असून, त्यांच्या जाण्याने पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये मोठी पोकळी निर्माण झाली आहे. आपल्या शोकसंदेशात प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, सुभाष चव्हाण यांनी प्रदेश काँग्रेसचे सचिव, सरचिटणीस, उपाध्यक्ष तसेच विधान परिषदेचे सदस्य म्हणून महत्त्वाची जबाबदारी सांभाळली होती. पक्षाने दिलेल्या जबाबदाऱ्यांमध्ये त्यांनी नेहमीच उत्कृष्ट कार्य केले.

सुभाष चव्हाण यांच्या निधनावर काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, पृथ्वीराज चव्हाण, माणिकराव ठाकरे, बाळासाहेब थोरात, यशोमती ठाकूर, असलम खान पठाण यांच्यासह काँग्रेसच्या अनेक नेत्यांनी तसेच विरोधी पक्षातील अनेक राजकीय पुढाऱ्यांनी शोक व्यक्त केला आहे.

# काँग्रेस आमदाराला मागितले न्यायालयाने स्पष्टीकरण

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २६ : महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक होऊन आता बराच काळ लोटला आहे. निवडणूक झाली, निकाल आली आणि बऱ्याच नाट्यमय घडामोडीनंतर देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात सरकार स्थापन झाली. निवडणुकीच्या निकालानंतर अनेकांनी विशेषतः विरोधी पक्षांनी ईव्हीएमवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

अनेक दिग्गज निवडणुकीत पराभूत झाल्यामुळे या चर्चांना अधिक बळ मिळाले. काँग्रेससह शिवसेना-ठाकरे गट आणि राष्ट्रवादी-शरद पवार गट यांनी भाजपसह इतर विजयी उमेदवांराच्या विजयावर सवाल उपस्थित केला. काही काँग्रेसच्या पराभूत उमेदवारांनी तर थेट उच्च न्यायालयात निवडणुक याचिका दाखल करत निवडणूक प्रक्रिया पुन्हा राबविण्याची मागणी केली.

मात्र पराभूत काँग्रेस उमेदवारांच्या या गर्दीत भाजपच्या एका पराभूत उमेदवाराने काँग्रेसच्या विजयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आणि काँग्रेसने डबल व्होटिंग करत विजय प्राप्त केल्याचा आरोप केला. न्यायालयाने यांप्रकरणी काँग्रेसच्या विजयी उमेदवाराला स्पष्टीकरण देण्याचे निर्देश दिले.

अकोला पश्चिम मतदारसंघातून काँग्रेसचे विजयी उमेदवार साजिद खान पठाण गैरमार्गाने निवडून आल्याने त्यांची आमदारकी रद्द करावी, अशी विनंती करणारी याचिका भाजपचे उमेदवार विजय कमलकिशोर अग्रवाल यांनी नागपूर खंडपीठात दाखल केली आहे. याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने पठाण यांना नोटीस बजावली आणि भूमिका मांडण्याचे आदेश दिले.

विधानसभा निवडणुकीच्या निकालाबाबत अनेकांनी प्रश्न निर्माण केले. विदर्भातील अशा अनेक पराभूत उमेदवारांनी निवडून आलेल्या आमदाराविरोधात याचिका दाखल केल्या आहेत. यात मुख्यत्वे आघाडीच्या तसेच भाजपविरुद्ध लढलेल्या उमेदवारांचा समावेश आहे. मात्र, काँग्रेसच्या विजयी उमेदवाराविरुद्ध केवळ एकच याचिका आली आहे.

अकोला पश्चिम मतदारसंघातील भाजपचे अधिकृत उमेदवार विजय कमलकिशोर अग्रवाल यांनी काँग्रेसचे विजयी उमेदवार साजीद पठाण याच्या विजयाला आव्हान दिले आहे. यावर न्या. अनिल पानसरे यांच्या खंडपीठासमक्ष सुनावणी झाली. न्यायालयाने या प्रकरणी पठाण यांना नोटीस बजावून १८ मार्चपर्यंत उत्तर सादर करण्याचे आदेश दिलेत.

### २७ निवडणूक याचिका

विदर्भातील एकूण २७ पराभूत उमेदवारांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या आहेत. यात, ईव्हीएमने निवडणूक घेण्यापूर्वी या कायदेशीर प्रक्रियेची पूर्तता निवडणूक आयोगाने केली नाही. निवडणूक घेण्यासाठी नोटिफिकेशन निवडणूक आयोगाने काढले नाही, निकालानंतर पराभूत उमेदवारांना सीसीटीव्हीचे फुटेज, फॉर्म नंबर १७ दिले जात नाही. व्हीव्हीपॅटची मोजणीसुद्धा केली जात नाही, असे आरोप करण्यात आलेत. अॅड. आकाश मून व अॅड. पवन डहाट यांच्यामार्फत या याचिका दाखल करण्यात आल्यात.

## पुण्याच्या घटनेनंतर कोल्हापूरही हादरले

# बंदुकीच्या धाकावर तरुणीवर बलात्कार

■ वृत्तसंस्था, अहिल्यानगर,दि.२७ : पुणे येथील स्वारगेट बस स्थानकावर बलात्काराची घटना ताजी असतानाच कोल्हापूर येथे देखील असाच धक्कादायक प्रकार घडला आहे. बंदुकीचा धाक दाखवत तरुणीवर बलात्कार केल्याची घटना घडली आहे.

कोल्हापूर येथील लक्षतीर्थ वसाहत येथे बंदुकीचा धाक दाखवत एका तरुणीवर बलात्कार करण्यात आला आहे. इतकेच नव्हे तर या नराधम आरोपीने शरीरसंबंधांचे व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत वारंवार बलात्कार केल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे. विश्वजित सचिन जाधव असे या नराधमाचे नाव असून त्याच्या विरोधात शाहपुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

पिडीत तरुणीने दिलेल्या फिर्यादीनुसार, आरोपी नराधमाने २०१८ पासून वेगवेगळ्या ठिकाणी नेऊन बलात्कार केल्याचे समजते. बंदुकीचा धाक दाखवत तसेच व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देत आरोपीने बलात्कार केला. दोनवेळा इच्छेच्या विरोधात गर्भपात करायला लावला असल्याचे पीडितेने सांगितले आहे. कोल्हापूरमधल्या या घटनेमुळे पुन्हा एकदा महाराष्ट्रातील तरुणी व महिला असुरक्षित असल्याचे अधोरेखित होत आहे. बदलापूर घटनेनंतर या घटना कमी होण्याच्या ऐवजी वाढतच जात असल्याचे दिसत आहे.

## पान १ वरून...

### आरोपीचा कसून शोध ....

पोलिसांनी पीडित तरुणीवर अत्याचार झाल्यानंतर घटनास्थळी धाव घेतली. त्यावेळी त्यांना शिवशाही बसमध्ये आरोपी दत्तात्रय गाडे याच्या पायातील एक बूट आढळला आहे. तो त्यांनी जप्त केला आहे. गुन्हे शाखेने बुधवारी रात्री उशिरापर्यंत दत्तात्र गाडे याच्या १० मित्र-मैत्रिणीची चौकशी केली. त्यातूनही पोलिसांच्या हाती काही महत्त्वाची माहिती लागली आहे.

दरम्यान, आरोपी दत्तात्रय रामदास गाडे एक सराईत गुन्हेगार आहे. त्याच्यावर यापूर्वीही अनेक गुन्हे दाखल आहेत. त्याच्या शोधासाठी सुरुवातीला ८ तपास पथके नियुक्त करण्यात आली होती. हा आकडा आता १३ वर पोहोचला आहे. पोलिसांनी त्याची माहिती देणाऱ्याला १ लाख रुपयांचे बक्षीस देण्याचीही घोषणा केली आहे.

### गृहराज्यमंत्र्यांचे अजब ....

मिरवणाऱ्या युती सरकारची नियत इतकी खालच्या स्तरावरची असताना महिलाना सुरक्षित कसे वाटेल? आरोपी हा सत्ताधारी आमदाराचा कार्यकर्ता असल्याचे माहिती होताच महायुती मंत्रिमंडळाकडून आता बलात्कारी आरोपीची बाजू घेऊन त्याला वाचवण्यासाठी धडपड सुरू झाली आहे का? असा सवाल वडेट्टीवार यांनी उपस्थित केला आहे.

### आरोपींची खैर ....

प्रकरणात लक्ष घालून आहे. मी स्वतः पुणे पोलिसा आयुक्तांशी चर्चा केली आहे. याप्रकरणी कठोर कारवाई करण्याच्या सूचना आम्ही सरकारच्या वतीने दिलेल्या आहेत. आरोपीचे सर्व लागेबांधे पोलिसांच्या हाती आलेले आहेत. त्याला कुठल्याही परिस्थिती तत्काळ अटक केली होईल. आरोपी हा कुठल्याही पक्षाचा असू द्या, त्याचा कोणाशीही संबंध असला, तरी त्याची गय केली जाणार नाही. हा गुन्हेगार आहे. गुन्हेगाराला सोडले जाणार नाही, असेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याशी माझी चर्चा झाली आहे. ज्या बस आगारात बंद पडलेल्या बसमध्ये होणारे गैरप्रकार पूर्णपणे बंद झाले पाहिजेत. अशा प्रकारच्या बंद पडलेल्या गाड्या तत्काळ निकाली काढाव्यात. कुठल्याही परिस्थितीत गुन्हेगारीला वाव मिळता कामा नये, अशा सूचना सर्व आगार प्रमुखांना दिल्याचे ते म्हणाले.

### वक्फ विधेयकात ....

विधेयकाची तपासणी करणाऱ्या जेपीसीने त्यांच्या मसुदा अहवालाला मान्यता दिली. जेपीसी बैठकीत ४४ सुधारणांवर चर्चा झाली. भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीए खासदारांच्या १४ दुरुस्त्या स्वीकारण्यात आल्या, तर विरोधी पक्षाच्या दुरुस्त्या पूर्णपणे फेटाळण्यात आल्या.

## उबाठाला कोल्हापूरमध्ये धक्का

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ : कोल्हापूर जिल्ह्यात उबाठा गटाला पुन्हा एकदा मोठा धक्का बसला आहे. हातकणंगले मतदारसंघाचे माजी आमदार डॉ. सुजित मिणचेकर आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) हातकणंगले जिल्हाप्रमुख गजानन जाधव यांनी आज उपमुख्यमंत्री आणि शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

शिंदे यांच्या मुक्तागिरी निवासस्थानी पार पडलेल्या या पक्षप्रवेश सोहळ्यात डॉ. मिणचेकर आणि गजानन जाधव यांनी शिवसेनेचा भगवा हाती घेतला. या प्रवेशामुळे कोल्हापूर जिल्ह्यात शिवसेनेची ताकद आणखी वाढणार आहे.

# कॉपी पुरवताना नायब तहसीलदार ताब्यात

■ वृत्तसंस्था, अहिल्यानगर,दि.२७ : पाथर्डी तालुक्यातील परीक्षा केंद्रावर नायब तहसीलदाराला कॉपी पुरवताना रंगेहाथ पकडले आहे. तोरडमल असे या नायब तहसिलदारांचे नाव आहे.

बारावी बोर्ड परीक्षेमध्ये स्वतःच्या पाल्यालाच कॉपी पुरवत असल्याची माहिती समोर आली आहे. पाथर्डी तालुक्यातील तनपूरवाडी परीक्षा केंद्रावर ही घटना घडली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी दाखल झाले.

यंदा बोर्डाच्या परीक्षा कॉपी मुक्त वातावरणामध्ये घेता याव्यात म्हणून कठोर नियमावली राबवली जात आहे. सामूहिक कॉपी करण्याचे प्रकार ज्या केंद्रावर उघडकीस येतील त्या केंद्राची मान्यता कायमस्वरूपी रद्द केली जावी. जे शिक्षक आणि कर्मचारी कॉपी करण्यासाठी मदत करतील त्यांना बडतर्फ करा, असे आदेश दिले आहेत.

पण आता नायब तहसीलदार आपल्या पाल्याला कॉपी पुरवताना रंगेहाथ पकडल्या गेल्याने त्यांच्यावर काय कारवाई होणार? याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# हनुमान टेकडीवरील ऑक्सिजन पार्कला आग

■ महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. २७ : येथील हनुमान टेकडीवरील ऑक्सिजन पार्कला आज दुपारी १ ते दीडच्या दरम्यान आग लागल्याची घटना घडली. आगीत पाच ते दहा हजार झाडे जळून खाक झाली असून, झाडांसह पाईप, ड्रीप आणी मोटर पंपही जळाले.

गांजा ओढण्यासाठी येणाऱ्यांनी आग लावली असावी असा अंदाज वैद्यकीय मंचाचे अध्यक्ष सचिन पावडे यांनी व्यक्त केला आहे. २०१४ मध्ये वर्धेच्या हनुमान टेकडी येथे ऑक्सिजन पार्कची निर्मिती केली. हा ऑक्सिजन पार्क महाराष्ट्रातला पहिला ऑक्सिजन पार्क होता. यां ऑक्सिजन पार्क मध्ये जवळपास पंचवीस हजार झाडे आहे. आज दुपारी अचानक यां ऑक्सिजन पार्कला आग लागली. या आगीत जवळपास पाच ते दहा हजार झाडे जळून खाक झाली. सोबतच झाडांच्या संगोपणासाठी येथे लावण्यात आलेल्या पाण्याच्या ड्रीप, पाईप आणी पाण्याची मोटरही जळाली.

हनुमान टेकडीवर वैद्यकीय जनजागृती मंच, विविध सामाजिक संघटना आणी जिल्हा प्रशासनाच्या वतीने ऑक्सिजन पार्क तयार करण्यात आले आहे. यां ऑक्सिजन पार्क मध्ये वृक्षाची लागवड करून त्याच संगोपन केले जातं आहे. या ऑक्सिजन पार्क मध्ये अनेकदा आग लागली मात्र ती तातडीने आटोक्यात आणली जाते.

आजही दुपारी येथे आग लागल्याचे महात्मा गांधी अंतराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाच्या नागरिकांच्या लक्षात आले.आग लागताच तेथील अग्निशमक यंत्रच्या सहाय्याने आग विजविण्यात आलीय मात्र तेवढ्या वेळेत ऑक्सिजन पार्क मधील पाच ते दहा हजार झाडे जळून खाक झाली. परिसरात काही युवक सिगरेट आणी गांजा ओढण्यासाठी येतात आणी ते येथेच ते फेकून जातात यामुळे नेहमीच आगीच्या घटना घडतात.

काही टवाळखोरांच्या चुकीने अश्या घटना घडतात.यां प्रकारबाबत प्रशासनालाही अवगत करण्यात आले होते. मात्र पोलिसांकडून अद्याप अश्या नशेखोर टवाळखोरांवर कोणतीच कारवाई न केल्याने त्यांची हिम्मत वाढत आहे. महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्व विद्यापीठाचे सुरक्षा अधिकारी सुधीर खरकाटे, राजू गुरनुले, अमित भुरे, नितीन शेंडे, राहुल पाटणकर, निलेश श्रीवास, रविंद्र पंचभाई, शुभम कळमकर, संजय आत्राम, निलेश पोटे, अभिनव वायुकर, प्रफुल्ल मुंगळे, आशिष कुमरे, मनोज शिरनामे, दिनेश लोणारे, रविंद्र वानखेडे आदिंनी आग आटोक्यात आणली.